


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १६५ * नांदेड * शनिवार, दि. २१ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## मनसेसोबत युतीसाठी महिनाभरात अहवाल द्या; उद्धव ठाकरेंच्या जिल्हाप्रमुखांना सूचना

**मुंबई (प्रतिनिधी)–** मनसेसोबत युतीसाठी आपण सकारात्मक आहोत. मात्र स्थानिक पातळीवर युती, आघाडी संदर्भात आढावा घेऊन माहिती द्या अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या. स्थानिक पातळीवर कुठे आघाडी, युती करायची याचा निर्णय पक्ष घेईल.

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुख नेत्यांची बैठक घेतली. राज्यभरात स्थानिक पातळीवर युती, आघाडी करण्यासंदर्भात आढावा घेण्याच्या सूचना दिल्या. जर युती, आघाडी झाली नाही तर सर्व जागांवर पक्ष म्हणून लढण्यास तयार राहण्याच्या सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या. याबाबत महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी द्यायचा आहे.

मतदार याद्यांचा अभ्यास करा, लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत मतदार कसे वाढले? कुठे वाढले? बोगस मतदार शोधा? गटप्रमुखांनी ४० लाख मतदार कसे वाढले हे तपासा, मतदार याद्यांच्या घोळाबाबत माहिती समोर आणा अशा सूचना उद्धव ठाकरेंनी दिल्या.

राज ठाकरेंना सोबत घेण्यासाठी उद्धव ठाकरे आणि शिंदेंमध्ये रस्सीखेच असल्याचं चित्र आहे. मनपात आकड्यांचं गणित जुळवण्यासाठी उद्धव यांना राज महत्त्वाचे वाटतात. तर आपली विश्वासार्हता वाढवण्यासाठी शिंदेंना हवा ठाकरे ब्रँड. त्यामुळे दोघांमध्येही राज ठाकरे सोबत यावेत यासाठी प्रयत्न सुरू आहे. जे राज्याला हवंय ते करणारच, असं स्पष्ट करत उद्धव ठाकरेंनी वर्धापनदिनाच्या मेळाव्यात मनसेशी युती करण्यासाठी सकारात्मक असल्याचे संकेत दिले. त्यावर एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरे युतीसाठी लाचार झाल्याची टीका केली होती.

## नियोजन समितीत २०२५-२६ साठी ८१५ कोटी २० लाखांची तरतूद



### विविध विकासकामे वेळेत पूर्ण करण्यावर भर -पालकमंत्री सावे

### सन २०२४-२५ साठी ७४८ कोटी ९९ लाख ९५ हजार रुपये खर्चास मान्यता

### पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२५-२६ साठी सर्वसाधारणसाठी ५८७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १६४ कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी ६४ कोटी २० लाख २० हजार रुपये याप्रमाणे एकुण ८१५ कोटी २० लाख २० हजार रुपयांच्या तरतुदीला मंजुरी देण्यात आली आहे, याबाबत राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडून आढावा घेण्यात आला.

शुक्रवार, दि. २० जून रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठक पार पडली. यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध विकास कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी भर देणार असल्याचे प्रतिपादन नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, हरिद्रा संशोधन प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार भीमराव केराम, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जून झाडे तसेच जिल्ह्यातील सर्व विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.

सुरूवातीला ३० जानेवारी २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या अनुपालनास मान्यता देण्यात आली. तसेच गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२४-२५ मध्ये झालेल्या ७४८ कोटी ९९ लाख ९५ हजार रुपये खर्चास मान्यता खर्चास मंजूरी देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना अशा एकत्रित जिल्हा वार्षिक योजनेच्या २०२५-२६ साठी आर्थिक तरतुदीच्या विनियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यात सध्या महावितरणच्या कामाबाबत येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन याबाबत लवकरच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येईल. यात सर्व अडचणी सोडविण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली. यासोबतच परिवहन विभागाबाबत ज्या काही लोकांच्या समस्या आहेत त्याबाबतही लवकरच बैठक घेवून हा प्रश्न निकाल काढण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदारसंघातील निधी अभावी प्रलंबित व प्रगतीपथावर असलेल्या कामांबाबतची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांना दिली. यावेळी लोकप्रतिनिधींनी काही गावांमध्ये स्मशानभूमीबाबत मागणी केली. त्यावर प्रत्येक आमदारांना स्मशानभूमीसाठी १ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

येत्या डिसेंबरपर्यत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयावर सोलर पॅनल उभारणार असल्याची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी यावेळी दिली. यामध्ये कार्यालयाच्या वीज बिलाची बचत होवून विजेच्या बिलापासून मुक्ती मिळणार आहे.

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या पावसामुळे केळी आणि पपई पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे होऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. याबाबत शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी या बैठकीत सांगितले.

## किनवटमध्ये डॉक्टर दाम्पत्याची ४६ लाखांची फसवणूक; तिघांविरुद्ध गुन्हा

**किनवट (प्रतिनिधी)–** जमीन खरेदीत भागीदारी देतो, असे सांगून किनवटमधील एका डॉक्टर दाम्पत्याची तब्बल ४६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या डॉक्टर लाईन येथील रहिवाशी डॉ. सौ. सारिका सुरेंद्र जन्नावार व त्यांचे पती डॉ.सुरेंद्र जन्नावार यांना मंजुषा विठ्ठलराव मुन्नरवार रा. किनवट, गोविंद साबन्ना जेठेवार व श्रीपाद अंबादास जेठेवार दोघेही रा. गोकुंदा यांनी संगनमताने दि. १५ सप्टेंबर २०२३ ते १९ ऑगस्ट २०२४ यादरम्यान डॉ. जन्नावार यांना इस्लापूर भागातील एका जमीन खरेदीत भागीदारी देण्याचे सांगत किनवटच्या सुशील मशिनरी शॉप मध्ये डॉ.जन्नावार यांच्याकडून नगदी ४६ लाख रुपये घेतले. परंतु ठरल्या प्रमाणे व्यवहार पूर्ण न करता संबंधित जमीन डॉक्टर दाम्पत्याच्या नावावर न करता ती परस्पर विकत जन्नावार यांना पैशांची परतफेड न करता त्यांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी डॉ.सारिका जन्नावार यांनी दि.१९ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी वरील तिघांविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३१८(४) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतमालाची नोंदणी केल्यास नाफेड एमएसपीने खरेदी करेल –अमित शाह

**मुंबई (प्रतिनिधी)–** लवकरच नाफेड शेतकऱ्यांकडून शेतमाल थेट खरेदी करेल. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (पॅक्स) २४ प्रकारचे व्यवसाय करू शकतील. दहा वर्षात कृषी निर्यात, सेंद्रिय अन्न आणि दूध या क्षेत्रात अमूल, कृभको आणि नाफेड या महाकाय संस्था होतील. तसेच सहकार क्षेत्राची विमा कंपनीही स्थापन करू, असा सहकारामार्फत ग्रामीण भारताच्या समृद्धीचा आराखडा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी येथे मांडला.

लवकरच देशात दोन लाख नव्या पॅक्स निर्माण झाल्यावर देशातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये पॅक्स असतील. त्यानंतर या संस्था, जन औषधकेंद्र, पेट्रोल पंप, गॅस वितरण, नळ योजनांची देखभाल, गोदामे, सहकारी टॅक्सी, विमान-रेल्वेचे बुकिंग आदी २४ कामे करू शकतील. तेथून जन्ममृत्यू प्रमाणपत्रही मिळतील. राज्य आणि केंद्र सरकार यांच्या ३०० योजनांचे केंद्र पॅक्स असेल, असेही शहा म्हणाले.

## ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं निधन झाले आहे. मुंबईच्या अंधेरीतील ओशिवरा इथल्या स्मशानभूमीमध्ये आज त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.



विवेक लागू हे ज्येष्ठ अभिनेत्री रिमा लागू यांचे पूर्वाश्रमीचे पती होते, तर अभिनेत्री लेखिका मृण्मयी लागू ही त्यांची मुलगी आहे. अनेक प्रसिद्ध मालिका आणि चित्रपटांमध्ये विवेक लागू यांनी काम केलंय. 'व्हॉट अबाऊट सावरकर', 'अग्ली', '३१ दिवस' या चित्रपटांममध्ये त्यांनी काम केलंय. याशिवाय 'चार दिवस सासूचे', 'हे मन बावरे' या गाजलेल्या मालिकांमध्येही त्यांनी काम केलं आहे.

## मुंबईत उद्धव ठाकरेंचे प्राबल्य; मनपा निवडणुकीबाबत चर्चा करू –शरद पवार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात लोकसभा विधानसभा निवडणुका झाल्यानंतर आता सर्वांचं लक्ष स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिका निवडणुकाकडे लागलं आहे. अशातच जागावाटप, चर्चा, गाठीभेटी, पक्षप्रवेश, दावे यामुळे देखील राजकारण चांगलच तापलं आहे, अशातच आज राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणुका लढण्याबाबत मोठं भाष्य केलं आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत आम्ही अजून काही ठरवलेलं नाही. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. साधारणपणे ३ महिन्यांत निवडणूक लागेल. आम्ही अजून चर्चा केली नाही. आम्ही कॉंग्रेस, उद्धव ठाकरेंच्या शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्ष एकत्रित बसून त्याबाबतची चर्चा करू. पण निवडणूक एकत्र लढण्याची इच्छा आहे, असं शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, मुंबईत उध्दव ठाकरे यांचे प्राबल्य आहे. त्याच्यामुळे मुंबईत एकत्र लढायचं का नाही ते बसून ठरवू. मुंबईत आम्हा सर्वांमध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद जास्त आहे. त्याचबरोबर साधारपणे ३ महिन्यात निवडणूक लागेल. आम्ही अद्याप लढण्याबाबत चर्चा केलेली नाही. आम्ही सर्वजण मिळून चर्चा करू. त्यामध्ये कॉंग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना, आम्ही स्वतः आणि शेतकरी कामगार पक्ष एकत्रित बसू असंही पुढे शरद पवार म्हणाले.

## विमानाच्या उड्डाणमार्गातील अडथळे हटवण्यासाठी केंद्राची नवीन नियमावली!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर एका आठवड्यानंतर, नागरी उड्डाण मंत्रालयाने विमान सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संरचनांवर नियंत्रण अधिक कडक करण्यासाठी नवीन मसुदा नियम जारी केले आहेत.

नवीन नियम लागू झाल्यानंतर विमानतळांजवळील उंच इमारती आणि झाडे यांसारखे अडथळे काढून टाकले जातील किंवा उंची कमी केली जाईल. या नियमांचा उद्देश अधिकाऱ्यांना विमानतळ क्षेत्रातील मर्यादेपेक्षा जास्त झाडे आणि इमारतींवर त्वरित कारवाई करण्याचा अधिकार देणे आहे. उड्डाण मार्गात अडथळा निर्माण झाल्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी हे एक पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

## शिवसेना महायुतीत आहे, आमच्या आमदारांना सोबत घेऊन चला


### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. कल्याणकर यांचा आक्रमक पवित्रा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यामध्ये सर्व आमदार हे महायुतीचे आमदार असून सर्व आमदारांना सोबत घेऊन चालावे अशी मागणी आमदार बालाजी कल्याणकर यांनी पालकमंत्री यांच्याकडे केली. आमदारांच्या मतदारसंघांमध्ये कामे प्रस्तावित करत असताना आमदारांना पण विश्वासात घेऊन कामे प्रस्तावित केली पाहिजे, मागच्या डीपीडीसीला पंधरा कोटींची कामे माझ्या मतदारसंघांमध्ये टाकली होती, आम्हाला एकही रुपयाचा निधी दिलेला नाही, आमच्याकडेही थोडं लक्ष असू द्या कारण आपण सर्व महायुतीचे आमदार आहोत, असे म्हणत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. बालाजी कल्याणकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला.

पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आ. कल्याणकर यांनी आक्रमक पवित्रा घेत अनेक मागण्या पालकमंत्र्यांकडे केल्या आहेत. यामध्ये नांदेड उत्तर मतदारसंघातील मौजे कासारखेडा या ठिकाणी श्री पंचमुखी महादेव मंदिर असून हे मंदिर हेमाडपंती बांधणीचे असून या ठिकाणी दरवर्षी लाखो भाविक येत असतात. सदरील देवस्थानाला क दर्जा देऊन तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात यावे. अशी मागणी त्यांनी यावेळी केली. मतदारसंघातील मौजे कासारखेडा व मौजे रहाटी ता.जि.नांदेड येथील आरोग्य उपकेंद्राचे काम पूर्ण झालेले असून त्या ठिकाणी फर्निचर व वैद्यकीय साधनांचा पुरवठा जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत उपलब्ध करून देऊन तात्काळ रुग्णांकरिता उपलब्ध करून द्यावी. माझ्या नांदेड उत्तर मतदार संघातील पांडुरंग नगर, विठ्ठल नगर व समाज कल्याण ऑफिसच्या पाठीमागील भाग या ठिकाणी दरवर्षी पावसाचे पाणी साचत असते. त्यामुळे वसाहतीतील नागरिकांच्या घरामध्ये पाणी घुसत असते. त्या कामाला जिल्हा नियोजन यंत्रणेअंतर्गत निधी मंजूर करून देऊन नाला पूर्ण करण्यात यावा अशी मागणी आ. कल्याणकर यांनी केली.

#### महावितरणच्या गलथान कारभारासह विकास कामातील दिरंगाईबाबत टोचले कान

शहर आणि ग्रामीण भागात वीज वितरण कंपनीचा सुरू असलेला भोंगळ कारभार आणि त्यामुळे वीज ग्राहकांना होत असलेला त्रास, बागायती शेतीचे नुकसान होत आहे. महावितरणचा गलथान कारभार त्वरित थांबून वीजपुरवठा कायम सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न करा, यासह नांदेड उत्तर भागातील विकास कामात होत असलेल्या दिरंगाईबाबत आ. कल्याणकर यांनी संबंधितांचे चांगलेच कान टोचले.




## धनंजय मुंडेंना पोटगीतील ५० टक्के रक्कम देण्याचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. करुणा शर्मा यांना लागू झालेल्या पोटगीतील ५०% रक्कम चार आठवड्यात न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानंतर करुणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. मुंडे हे मूळात चांगले आहेत, पण त्यांच्यामागे असलेल्या 'दलाल गँग'मुळेच त्यांची चुकीची पावलं पडत आहेत, असा दावा करुणा मुंडे यांनी केला.

## यशस्वी जायसवालचे ऐतिहासिक शतक, लीड्समध्ये भारत मोठ्या धावसंख्येच्या दिशेने



**लीड्स (वृत्तसंस्था)–** भारत आणि इंग्लंड यांच्यात पहिल्या कसोटी सामन्याला सुरूवात झाली आहे. पहिल्याच दिवशी भारतीय संघ फलंदाजी करत असून भारताचा क्रिकेटर यशस्वी जायसवालने ऐतिहासिक शतक ठोकले आहे.

यशस्वी जायसवालच्या शतकाच्या जोरावर भारत मोठ्या धावसंख्येच्या दिशेने जाताना दिसत आहे. यशस्वीने १६ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १४४ धावांवर आपले शतक पूर्ण केले. यशस्वीचे कसोटी करिअरमधील हे ५ वे शतक आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा कसोटी क्रिकेटमधून रिटायर झाल्यानंतर पहिल्यांदा टीम इंडिया मैदानात उतरली आहे. शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे. भारतीय संघाने २०० धावांचा टप्पा पार केला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# चीनची दुष्ट युद्धनीती हेच विनाशाचे मूळ

जगातील आपला भारत देश हा एकमेव असा देश आहे की, जो सगळ्या बाजूने शत्रूने घेरलेला आहे. पाकिस्तान, बांगलादेश, चीन आणि नव्याने भर पडलेला नेपाळ. या सर्व शत्रूंपैकी पाकिस्तानपेक्षाही चीन आपल्या देशासाठी सगळ्यात घातक आहे. तो केवळ भारतासाठीच नव्हे तर जगातील इतर देशांसाठी सुद्धा अत्यंत अविनाशकारी सिद्ध होतो आहे. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे धोरण. भारताला चीनबद्दल खरी चिंता दोन आघाड्यांवरच्या संभाव्य संघर्षाची आहे. चीन आणि पाकिस्तान दोघांविरुद्ध एकत्र लढण्याची वेळ आल्यास भारताच्या संसाधनांवर ताण येऊ शकतो. मात्र, आजवर घडलेल्या घटनांवरून असे दिसते की, चीन पाकिस्तानसाठी रणभूमीत उतरणार नाही. चीनचा ध्येयवाद केवळ विजय मिळविणे नव्हे, तर आपली सत्ता वाढवणे आणि इतर देशांच्या निर्णयक्षमतेवर परिणाम घडवणे हा आहे. त्यामुळे चीनचे युद्ध हे रणांगणात न होता, मनःपटलावर लढले जाते. त्यामुळे भारतासारख्या देशांना भविष्यातील युद्धासाठी केवळ शस्त्रास्त्रांचा नव्हे, तर राजनैतिक, आर्थिक, तांत्रिक आणि मानसिक स्तरावरही सज्ज राहावे लागेल. कारण चीनचा खरा धोका त्याच्या शस्त्रांपेक्षा, त्याच्या रणनीतीत आणि शांततेच्या मुखवट्याआड लपलेल्या नियंत्रणाच्या आकांक्षेत आहे. चीनचे वाढते सामर्थ्य, त्यांची 'वुल्फ वॉरियर' रण-नीती, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि आक्रमक वक्तव्ये यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर नेहमीच एक भीतीचं सावट निर्माण झालं आहे. परंतु या सर्व गर्जनेत एक गोष्ट स्पष्ट दिसते की, चीन स्वतः थेट युद्धभूमीवर कधीही उतरलेला दिसत नाही. त्याच्या सामर्थ्याचा आणि प्रभावाचा मुख्य पाया सैनिकी शक्तीपेक्षा राजनैतिक कुटिलता आणि धोरणात्मक खेळींमध्ये आहे. चीनचा युद्धसिद्धांत पारंपरिक युद्धाच्या संकल्पनांपेक्षा खूप वेगळा आहे. यामागे आहे प्रसिद्ध चिनी तत्वज्ञ 'सुन झू' यांचे 'आर्ट ऑफ वॉर' या ग्रंथातील तत्त्वज्ञान. या ग्रंथानुसार, शत्रूला प्रत्यक्ष लढाई न करता हरवणे हेच खरे युद्धशास्त्र. चीन हेच तत्त्व आजच्या युगात मोठ्या खुबीने पाळतो आहे. ते सीमा भागात लष्करी गडबड निर्माण करत असले, तरी प्रत्यक्ष युद्धात उतरण्याचे टाळतात. रशिया-युक्रेन संघर्षात जरी चीनने रशियाशी मैत्रीची भाषा केली, तरी सैनिकी पाठबळ दिलेले दिसत नाही. इस्राईल-गाझा संघर्षातही चीनने कुठलीही ठोस भूमिका घेतलेली नाही. एकीकडे अमेरिका, युरोपियन राष्ट्रे, नाटो देश हे युद्धात प्रत्यक्ष सामील झालेले दिसतात, तर दुसरीकडे चीन केवळ गोडगोड शब्दांत भूमिका स्पष्ट करतो. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील संघर्षातही चीनची भूमिका नेहमीच शब्दांपुरती मर्यादित राहिलेली आहे. दुष्टपणाचा पुतळा असलेल्या पाकिस्तानला प्रत्यक्ष मदत न करता चीनने केवळ राजनैतिक पातळीवर पाठिंबा दिला. सैनिकी सहाय्याची कुठलीही ठोस पावले उचललेली दिसत नाहीत. याचे कारण स्पष्ट आहे की, चीनच्या डोळ्यां-समोर फक्त युद्ध जिंकण्याचा विचार नसतो, तर भविष्यातील नियंत्रण आणि प्रभाव प्रस्थापित करण्याचे लक्ष्य असते. त्यामुळेच ते थेट युद्ध टाळून इतर मार्गांनी शत्रूला गुंतवून ठेवतात तर कधी आर्थिक कर्जाच्या जाळ्यात, कधी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सायबर हल्ल्यांनी, तर कधी राजनैतिक दबावाच्या रणनीतीने. हंबनटोटा बंदराचे उदाहरण घ्या. श्रीलंकेकडून कर्जवसुलीत अपयश आल्यावर चीनने हे बंदर ९९ वर्षांसाठी घेतले. हे युद्ध नव्हे, पण त्याहून प्रभावी 'भूराजकीय विजय' होता. ऑस्ट्रेलियावर 'वोल्ट टायफुन'सारखा सायबर हल्ला करून चीनने दाखवून दिले की, युद्धाचे मैदान आता डिजिटल जगतातही आहे. चीन दक्षिण चीन समुद्रात कृत्रिम बेटं उभारतो, नकाशांमध्ये आक्रमक बदल करतो आणि आपल्या सीमांचे नवे दावे करतो. या सर्व गोष्टी पारंपरिक युद्ध न करता सामरिक विस्ताराचा भाग आहेत. यामागे सुन झू यांचे तत्त्वज्ञान आहे, जेव्हा शत्रू सजग असेल, तेव्हा युद्ध टाळा, पण त्याच्या दुर्बल क्षणी हल्ला करा. अमेरिका आणि युरोपियन राष्ट्रांनी हजारो सैनिक गमावले, अब्जावधी डॉलर्स खर्च केले. त्यांच्या युद्धात थेट सहभागामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेवर आणि नागरिकांवर परिणाम झाला. याउलट चीनने 'मौन' आणि 'नियोजित हस्तक्षेप' यांचा वापर करून स्वतःचे नुकसान टाळले आणि आपली ताकद अबाधित ठेवली. चीनचा अजेंडा सरळ आहे. थेट युद्ध नको, पण प्रभुत्व हवे. ते आर्थिक आणि तांत्रिक मार्गांनी शक्य झाले तर सर्वोत्तम. पाकिस्तान, उत्तर कोरिया, रशिया यांच्याशी हातमिळवणी करत त्यांनी पश्चिमेला एक पर्यायी ध्रुव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु याही प्रयत्नांत त्यांनी रणभूमीवर शिरकाव केला नाही.

# योग म्हणजे एकात्मता



येत्या बुधवार, दि. २१ जून २०२५ रोजी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगात साजरा होत आहे. नागरिकांनी योग, प्राणायाम, आसने करून आपले आरोग्य ठणठणीत ठेवण्याचा संदेश या दिनानिमित्ताने दिला जातो. त्यामुळेच हा लेखन प्रपंच.

योग ही भारताने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. युनायटेड नॅशनल जनरल असेंब्लीच्या ६९ व्या सत्रात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव दिला. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशाचे सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला आणि २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. जगभरात दरवर्षी २१ जून हा योग दिन म्हणून अतिशय आनंदाने साजरा केला जातो. २०१५ मध्ये दिल्ली येथील राजपथ येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन केले. तेव्हा ८४ देशाचे नागरिक उपस्थित होते. त्यावेळी तरुणांना योग करण्याचं मंत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. त्यावेळी त्यात दिव्यांगांचाही समावेश होता. आरोग्यासाठी योगाचा मंत्र दिला. यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिन अकरावा आहे. आपण तो साजरा करत आहोत. हा दिन संपूर्ण जगात शाळा, महाविद्यालयात वेगवेगळ्या संस्थेत प्रतिष्ठानाद्वारे साजरा करत आहोत.

**योग म्हणजे एकात्मता होय**

सर्व सजीव सृष्टी ही एकमेकांशी जोडली गेलेली आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे योगा होय. भारतात योगा प्राचीन काळापासूनच आहे. योगामध्ये विविध योग सूत्राचा वापर केला जातो. नियम, प्रत्याहार ज्ञान, आसन, भक्ती, ध्यान अशा बाबी त्यामध्ये समाविष्ट केल्या जातात. मानवाला आपल्या जीवनात आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक स्तरावर योगांनी विकास घडवून आणता येतो. संपूर्ण जगात योगाचा प्रचार झाल्यानंतर भारत आणि जग यांची जीवनपद्धती जवळजवळ सकारात्मक बनते. ती शांततेसाठी आपणाला उपयोगी पडते. योग हा जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये संतुलन ठेवण्याव्यतिरिक्त आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टिकोन प्रदान करतो. जीवन सुखी, समृद्ध व आनंदी बनविण्यासाठी योग महत्त्वाची भूमिका बजावतो. योग चिकित्सा, प्रणायाम, योगासन, सूर्यनमस्कार अशा सर्व बाबींची माहिती योगामध्ये होते. २०१५ - सुसंवाद आणि शांततेसाठी योग, २०१६ -शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग, २०१७- मध्ये आरोग्यासाठी योग, त्यानंतर २०१८- शांततेसाठी योग, २०१९- हृदयासाठी योग, २०२० - कौटुंबिक योग, २०२१- कल्याणकारी योग, २०२२- मानवतेसाठी योग आणि यावर्षी २०२३ वसुधैव कुटुंबकम योग साजरा केले जात आहेत.

भारतात पतंजली मुनीच्या काळापासून योग चालू आहे. त्यानंतर स्वामी विवेकानंदांनी जगभर योगा-चा प्रचार व प्रसार केला. त्यानंतर योग गुरु रामदेव बाबा तसेच श्री रविशंकर यांनी सुद्धा योगाचा प्रचार व प्रसार केलेला आहे. आपणही करत आहोत. अशा पद्धतीने योग केलेले आहेत. सर्वांना उत्तम आरोग्य हवे तर योग करण्याशिवाय पर्याय नाही हे आपणास आता समजत आहे. योग का करावा? आपण जे अन्न खातो त्याचे पचन व्हावे. हात, पाय, पोट, मान, पाठ याचे स्नायू बळकट व्हावेत तसेच हृदयविकारापासून व इतर रोगापासून मुक्ती मिळावी यासाठी दररोज योग करणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी न चुकता योग करावा. योगाने शरीर निरोगी व बळकट बनते. तसेच उत्तम मानसिक आरोग्य लाभते. वजन नियंत्रणात राहते. कोणत्याही गोष्टीचा संयम आपोआप येतो. अनेक रोगांना लढण्याची क्षमता शरीरात योगामुळे निर्माण होते. तसेच आज उत्तर गोलार्धात भौगोलिकदृष्ट्या २१ जून हा सर्वात मोठा दिवस म्हणून ओळखला जातो. २१ जूनपासून सूर्य आपली स्थिती बदलतो म्हणजेच उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते हा एक नैसर्गिक बदल आहे. तेव्हापासून उष्णता कमी होते व वातावरणात फरक जाणवतो. २१ जूनला योग दिन तसेच सर्वात मोठा दिन असा योगायोग आहे. योगाच्या प्रचंड लोकप्रियतेपुढे जगभरातील विविध भागात योग केंद्रे आणि स्टुडिओची स्थापना झाली आहे. सर्वांनीच दररोज योगा करून आपले जीवन आरोग्यदायी ठेवावे.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष
विठू माऊली प्रतिष्ठान
गोकुळवाडी ता. मुखेड, जि. नांदेड

# अंतराळातील जीवनाचा शोध : भारतीय वैज्ञानिकाचा थक्क करणारा शोध



सृष्टीच्या आरंभापासूनच मानवाच्या कल्पनाशक्तीला गोंधळात टाकणारे, विस्मयकारी आणि अनंत अशा अंतराळाचे गूढ अजूनही वैज्ञानिकांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. आपल्या डोळ्यांसमोर अस-लेला अथांग आकाश आणि त्यामागील अनोळखी जग सदा आपल्याला आकर्षित करत आले आहे. चंद्र, मंगळ, आणि अन्य ग्रहांपर्यंत मानवी यानं पोहोचलं असलं, तरीही अंतराळातील रहस्यं, जी-वनाची शक्यता आणि प्रगत सभ्यतांचे अस्तित्व यासंदर्भातील प्रश्न आजही अनुत्तरितच आहेत.

या पार्श्वभूमीवर केंब्रिज विद्यापीठात कार्यरत असलेले भारतीय वंशाचे खगोलशास्त्रज्ञ निक्कू मधुसूदन यांनी दिलेल्या संशोधनाने संपूर्ण जगाला अचंबित करून टाकले आहे. त्यांच्या टीमने बाह्यग्रह (exoplanet) K2-18B वर काही असे संकेत शोधले आहेत, जे जीवनाच्या अस्तित्वाच्या शक्यतेकडे ठोस इशारा करतात. हे संशोधन केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाचं नाही, तर ते मानवजातीच्या भविष्यासाठी देखील फार मोठं पाऊल ठरू शकतं.

**'K2-18B': एक रहस्यमय आणि आशादायक ग्रह**

'K2-18B' हा ग्रह पृथ्वीपासून तब्बल १२० प्रकाशवर्षे दूर आहे. तो एक 'हायसिअन वर्ल्ड' मानला जातो, म्हणजे असं स्थान जिथं हायड्रोजनयुक्त वातावरण असून महासागरांसारख्या जलरूप साठ्याचं अस्तित्व असण्याची शक्यता आहे. हाच ग्रह वरुण ग्रहापेक्षा लहान असला तरी तो पृथ्वीपेक्षा सुमारे अडीचपट मोठा आहे. या ग्रहाभोवती एक लाल तारा (Red Dwarf) परिभ्रमण करत असून, हा तारा आपल्या सूर्यापेक्षा लहान, थंड आणि दीर्घकाळ टिकणारा आहे. यामुळे K2-18B वर स्थिर वा-तावरण टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे.

**जैविक गंधाची शंका: DMS वायूचा स्फोटक संकेत**

या संशोधनात सर्वाधिक लक्ष वेधून घेण-ारी बाब म्हणजे डायमिथाइल सल्फाईड (DMS) नावाच्या वायूचा शोध. ऊ्वड ही वायू पृथ्वीवर फक्त सूक्ष्म जीवजंतू आणि सजीव प्रक्रियांद्वारे तयार होते. समुद्रातील प्लवक, वनस्पती आणि जीवजंतूंमधील जैविक घडामोडींमध्ये ऊ्वड तयार होतं. त्यामुळे या वायूचा शोध लागणं म्हणजेच त्या ग्रहावर जीवनाचं अस्तित्व असू शकतं, असा प्राथमिक निष्कर्ष वैज्ञानिकांनी मांडला आहे.

या वायूचा वास विशिष्ट असतो, ती रंगहीन आणि ज्वलनशील आहे. औद्योगिक क्षेत्रातही ऊ्वड चा वापर केला जातो, पण अंतराळात तिचं अस्तित्व हे अत्यंत असामान्य व रहस्यमय आहे. त्यामुळेच या संकेताला एलियन स्वरूपाच्या जैविक जीवनाचे संभाव्य संकेत मानलं जात आहे.

**'Hycean World' संकल्पना: एका नवीन पृथ्वीची नांदी?**

प्रा. मधुसूदन यांनी 'कूलशरप थेीश्रव' ही संकल्पना मांडली आहे, जी आजपर्यंतच्या खगोलशास्त्रात एक नवीन दृष्टीकोन देण-ारी ठरते. हायसिअन वर्ल्ड म्हणजे असे ग्रह जिथे हायड्रोजनयुक्त वातावरण असतं आणि द्रवरूप महासागरही संभवतात या वातावरणात जीवनाचा जन्म आणि उत्क्रांती होण्यासाठी उपयुक्त अशा गोष्टी असू शकतात.

यातील आणखी एक विशेष बाब म्हणजे K2-18B ग्रहाच्या वातावरणात आढळलेल्या आण्विक छटा. वैज्ञानिक विश्लेषणानुसार, त्या छटा अशा संयुगांची आ-हेत, ज्या केवळ सजीव प्रक्रियांच्या घडामोडींमुळे तयार होतात. त्यातही विशिष्ट अशा बायोसिग्नेचर संकेतांची उपस्थिती अधिक लक्षवेधी आहे. यामुळे एलियन जीवनाच्या शोधात ही एक ऐतिहासिक आणि निर्णायक पायरी ठरण्याची शक्यता आहे.

**विज्ञानाच्या आकाशात भारतीयांची प्रतिभा**

या महत्त्वपूर्ण शोधामागे असलेले वैज्ञानिक निक्कू मधुसूदन हे मूळ भारतीय असून आज केंब्रिजसारख्या नामवंत विद्यापीठात संशोधन करत आहेत. त्यांचे कार्य हे केवळ विज्ञानासाठी नव्हे, तर भारतासारख्या देशाच्या वैज्ञानिक प्रतिभेचंही प्रतीक आहे. त्यांच्या या यशाने पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे की भारतात प्रतिभेची कमी नाही, अभाव आहे तो योग्य संधी, सुविधा आणि मेंदू पलायन थांबवण्याचा.

**मंगळ आणि टायटन: इतर ग्रहांचाही अभ्यास सुरूच**

अंतराळातील जीवनाच्या शोधासाठी वैज्ञानिक आज विविध ग्रह व उपग्रहांचा अभ्यास करत आहेत. उदाहरणार्थ, २०१५ मध्ये नासाच्या एका उपग्रहाने मंगळ ग्रहावर प्राचीन महासागर असल्याचं अनुमान व्यक्त केलं होतं. पृथ्वीच्या आर्कटिक महासागरा-पेक्षाही मोठा जलसाठा कधी काळी तिथं होता. मात्र सुमारे ३०० कोटी वर्षांपूर्वी तो महासागर नाहीसा झाला, आणि त्यातील ८७ टक्के पाणी गायब झालं. काही तज्ज्ञांच्या मते, हे पाणी खनिजांमध्ये मिसळलं किंवा अंतराळात उडून गेलं असावं. तसंच शनीच्या उपग्रह 'टायटन' वर देखील मिथेन वायूचा साठा, नद्या, सरोवरे आणि वातावरणाचं अस्तित्व असल्याचे पुरावे मिळाले आहेत. त्यामुळे टायटन ही पृथ्वीशिवाय जीवनासाठी योग्य दुसरी जागा असू शकते, असं वैज्ञानिक मानतात.

**अजूनही बरेच अनुत्तरित प्रश्न...**

या सर्व संशोधनामुळे एक गोष्ट निश्चित आहे अंतराळात जीवन असण्याची शक्यता ही आता केवळ काव्यगंधीत कल्पना उरलेली नाही, तर ती एक वैज्ञानिक शक्यता म्हणून गंभीरतेने घेतली जात आहे.मात्र याचे अंतिम निष्कर्ष अजून दोन-तीन वर्षांनंतर स्पष्ट होतील. तोपर्यंत जगभरातील वैज्ञानिक या संशोधनाच्या प्रत्येक पावलाकडे उत्सुकतेने पाहत आहेत.

मानवाच्या हजारो वर्षांच्या जिज्ञासेचा, श्रद्धेचा आणि विज्ञानाच्या प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा आता जवळ येतोय असं म्हणायला हरकत नाही. एलियन जीवन खरंच अस्तित्वात आहे का? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याच्या उंबरठ्यावर आपण आहोत. घ२-१८इ या ग्रहावर जीवनासारख्या छटांचा शोध लागणं हे केवळ एक वैज्ञानिक शोध नसून, मानवजातीच्या अस्तित्वाचा एक संभाव्य आरसा ठरू शकतो.

प्रा. निक्कू मधुसूदन आणि त्यांच्या पथकाने उभारलेल्या या वैज्ञानिक शोधयात्रे-मुळे पुन्हा एकदा हे सिद्ध होतं की कल्पकतेला सीमा नसते आणि ज्ञानाच्या आकाशात भार-ताचे झेंडे मोठ्या अभिमानाने फडकू शकतात.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# आंतरराष्ट्रीय योग दिन




आज २१ जून. आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते.

२१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दीनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग.

आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो; शिवाय मनावरहीचांगलेसंस्कारकरूशकतो. भारतातीलयोगाचीसंस्कृतीजागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे. आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# एक सकारात्मक जीवनशैलीची दिशा



अकरावा जागतिक योग दिन २१ जून रोजी संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे. ही एक अशी दिव्य संकल्पना आहे जी भारताने जगाला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या झगमगाटातही भारताने योगाच्या माध्यमातून जीवन जगण्याची सत्य दिशा जगाला दाखवली आहे.

**योगाचा ऐतिहासिक प्रवास : मूळ आणि महत्त्व**

योगाची सुरुवात ही सुमारे अडीच ते तीन हजार वर्षांपूर्वी झाल्याचे ऐतिहासिक पुरावे मिळतात. बौद्ध व जैन परंपरेतील मठांमध्ये तसेच महाभारत व भगवद्गीतासारख्या प्राचीन ग्रंथांमध्ये योगाच्या विविध अंगांचा उल्लेख सापडतो. चित्तवृत्ती निरोधः ही पतंजली योगसूत्रातील योगाची साधी व्याख्या आजही तितकीच प्रभावी आहे, म्हणजेच मनातील गाठी सोडवणे!

**योग: शरीर आणि मनाची समृद्धता**

योग म्हणजे केवळ आसने किंवा प्राणायाम नव्हे, तर शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील समरसता आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण तणावाखाली आहे. अशा वेळी योग ही एक संजीवनीसारखी जीवनशैली ठरते. योगामुळे केवळ आरोग्य सुधारते असे नाही, तर आपल्यामध्ये सकारात्मक ऊर्जा, संयम, निर्णयक्षमता आणि आनंदही निर्माण होतो.

**दिवसाची सुरुवात योगाने : एक आनंदमय आरंभ**

जर दिवसाची सुरुवात आपण सूर्यनमस्काराने केली, तर तो दिवस अधिक सकारात्मक आणि उत्साही ठरतो. योग हा केवळ एक तासाचा कार्यक्रम नाही, तर संपूर्ण दिवस आणि आयुष्यभर जगण्याची पद्धत आहे. सकाळी शांततेने श्वासावर लक्ष केंद्रित करणे, मनाची स्थिती स्थिर ठेवणे, आहारात सात्त्विकता पाळणे आणि कामाच्या ठिकाणी संयम राखणे हे सारे योगाचेच अंग आहेत.

**योगाचे सात व्यवहारिक पैलू**

**१. प्रभाती ध्यान :** उठल्यानंतर ५ मिनिटे शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित करा. **२. संयमित वाणी :** दिवसभर शक्यतो शांत व संयमित राहून काम करा. **३. सात्त्विक आहार :** हलका, चविष्ट व पौष्टिक आहार वेळेवर व अन्नपूजेसह घ्या. **४. दीर्घ श्वास-प्रश्वास :** कामाच्या दरम्यान काही क्षण दीर्घ श्वास घेत राहा. **५. निर्णयपूर्व शांती:** महत्त्वाचे निर्णय घेताना काही क्षण डोळे मिटून मन स्थिर करा. **६. वाद टाळा:** कुठलाही वाद झाला, तर लगेच उत्तर न देता पाच मिनिटे शांत बसा. **७. झोप पूर्व विश्रांती:** रात्री निद्रासन किंवा श्वसन ध्यान करून झोप घ्या.

**युवक आणि योग : उन्नतीचा आधार**

भारत हा तरुणांचा देश आहे. मात्र आजच्या तरुणांमध्ये तणाव, व्यसनाधीनता आणि मानसिक अस्थिरता मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. योग म्हणजे एक अशी क्रिया जी त्यांना या अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाऊ शकते. ध्येयपूर्ती, एकाग्रता, आत्मविश्वास आणि तंदुरुस्त शरीर हे सगळं योगाने शक्य होतं.

**आत्मिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य**

बाह्य सौंदर्य क्षणिक असते, पण योगामुळे निर्माण होणारं आत्मिक तेज दीर्घकाळ टिकतं. योग्य आहार, सातत्यपूर्ण साधना, संयमित जीवनशैली यामुळे चेहऱ्यावर निसर्गसिद्ध तेज दिसून येते. आत्महत्या, नैराश्य, चिंता या गोष्टी योगामुळे टळू शकतात.

योग केवळ शरीराची व्यायामपद्धती नाही, तो एक दृष्टीकोन आहे. जगण्याची समरस आणि संतुलित शैली आहे.

**योग, एक जीवन मंत्र**

जगाला भारताने दिलेली ही योगसंपदा, केवळ २१ जूनपुरती मर्यादित न ठेवता, दररोजच्या जीवनात रुजवणे आवश्यक आहे. आपले मन, शरीर आणि आत्मा यांचा त्रिवेणी संगम योगामध्ये साध्य होतो आणि तोच आपल्याला आनंदी, आरोग्यदायी व यशस्वी आयुष्याकडे घेऊन जातो.



**प्रा. डॉ. भगवान सूर्यवंशी**
नांदेड.

## थोडक्यात...

### भाजप महानगरच्यावतीने आज योग शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षाच्या नांदेड महानगरच्यावतीने शनिवारी दि. २१ जून रोजी योग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२१ रोजी सकाळी ७ वाजता गुरुद्वारा परिसरातील श्री ग्रंथ साहिब हॉल यात्री निवास येथे होणाऱ्या या योग शिबीरास राज्याचे माजी मुख्यमंत्री व राज्यसभा खा. अशोकराव चव्हाण, राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या योग शिबीराचा शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड भाजपाचे महानगराध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांनी केले आहे.

### सोलर पॅनेलचे नुकसान, भरपाईची मागणी

**मुदखेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील मौजे रोही पिंपळगाव येथे दोन दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली होती. त्यामध्ये काही शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच वादळी वाऱ्यामध्ये कृष्णाबाई विलास हनुमंते यांच्या शेतातील बोअरवेल वर बसवलेले सोलार पॅनेल्सच्या प्लेट हवेचे अतिदाबामुळे अतोनात नुकसान झाले आहे. मुदखेड तालुक्यातील ठिकठिकाणी शेतातील सोलार संचाचे नुकसान झाले आहे. तसेच रात्रीच्या वेळी सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे तालुक्यातील केळीच्या बागाही उद्ध्वस्त झाल्या आहेत. या अस्मानी संकटामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांसाठी 'क्युआर' कोडचे पालकमंत्री सावे यांच्या हस्ते उद्घाटन

- मिशन निर्भया–मुलींच्या सुरक्षीततेसाठी, स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन सत्रे
- मिशन समाधान 'क्युआर' कोड आधारीत व व्हॉट्सअप चॅटबॉटव्दारे तक्रारींचे त्वरित निवारण

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस प्रशासन आणी समाज यांच्यात विश्वास आणि सुरक्षितता निर्माण करण्याच्या दृष्टीने मिशन निर्भया हा एक महत्वपुर्ण उपक्रम आहे. या अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या क्युआर कोड सिस्टीमचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारीक उर्जा तथा पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन समारंभाला माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार इतर मान्यवर उपस्थित होते.

महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांच्या संरक्षणासाठी या उपक्रमा अंतर्गत निर्भया ही विशेष योजना राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थीनी व महीला यांना स्वयंस्वरक्षनाचे प्रशिक्षण मार्गदर्शन सत्रे आणि कायदेशीर व मानसिक सल्ला दिला जातो हा उपक्रम महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना सशक्त बनविण्याचे कार्य करते. सुरक्षीत आणि सक्षम समाज घडविण्यासाठी हे पाउल अत्यंत महत्वाचे ठरणार आहे.

यामध्ये शहरातील सर्व कोचींग इन्स्टीट्युट आणि क्लासेस मधील जवळपास ५०,००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षीत करण्याचे उद्दीष्ट आहे. तसेच विशेषत: पोस्ट ग्रॅज्युएशन च्या १०,००० मुली व विद्यार्थी तसेच शाळा व महाविद्यालयीन २०,००० विद्यार्थी व १५०० शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जवळपास ५००० मुली व लहाण मुले यांना पोलीस परेड ग्राउंडवर सेल्फ डिफेन्स संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

विशेष लैंगीक अत्याचाराचे तपास हाताळण्यासाठी पोलीस अंमलदारांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. लैंगीक अत्याचाराचे गुन्हयाचा तपास वेळीच पुर्ण करण्यासाठी २००० पोलीस व सरकारी वकील यांना विशेष प्रशिक्षण दिले जानार आहे. पालक व कुटुंबासाठी देखील सत्र आयोजीत करण्यात येणार असुन यामध्ये जवळपास ५०० कुटुंब २५ सदस्यांचा सहभाग नोंदविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रथम टप्यात थेट लाभार्थी ९०,००० ते १,००,००० च्या जवळपास असतील दुसरा टप्पा हा ग्रामीण भागात आयोजीत करण्याचे ठरविले आहे.

**क्युआर कोड व्दारे त्वरीत विद्यार्थी व महीला यांची तक्रार नोंदणी**

नांदेड पोलीस विभागाच्या वतीने महीला, बालक व विद्यार्थी यांच्या सुरक्षीततेसाठी ट्ठ कोड आधारीत तक्रार निवारण सुविधा सुरू करण्यात आली आहे. कोंचीग क्लास परिसर व इतर ठिकाणी होणाऱ्या ईव्ह–टिझींग, छेडछाड, पाठलाग, छळ, संशयास्पद हालचाली नशेच्या पदार्थांची अवैध विकी मोबाइलचा गैरवापर यांसारख्या घटनांसाठी विद्यार्थी व महीला फक्त ट्ठ कोड स्कॅन करून तकार करू शकतात या तक्रारी थेट संबधीत पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतात व त्वरीत कार्यवाही सुनिश्चित केली जाते.

तसेच वरील गुन्हयांना जागीच प्रतिबंध व्हावा व स्त्रियांना भयमुक्तपणे संचार करता यावा म्हणुन स्ट्रिट सेफ्टी पथक कार्यान्वीत असुन यामध्ये १) चार्ली मोबाईल पेट्रोलींग २) पायी पेट्रोलींग ३) दरोडा विरोधी पेट्रोलींग ४) दामिनी पेट्रोलींग ५) पि सी आर पेट्रोलींग ६) पोलीस स्टेशन पेट्रोलींग कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.

# छेडछाड रोखा, विद्यार्थीनींमध्ये विश्वास निर्माण करा –आ.श्रीजया चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस प्रशासनाने नांदेड शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसच्या परिसरात गस्त वाढवावी. जनजागृती मोहीम राबवून विद्यार्थीनींमध्ये विश्वास निर्माण करावा. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये तक्रार नोंदविण्याचे दूरध्वनी क्रमांक दर्शनी भागात ठळकपणे लावावेत. छेडछाड होत असेल तर तक्रार करण्यासाठी विद्यार्थीनींना हिंमत द्यावी. त्यांच्या तक्रारींवर वेगाने चौकशी करून योग्य कारवाई करावी, अशी मागणी भोकरच्या आमदार ॲड. श्रीजया चव्हाण यांनी केली.

पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी भोकर विधानसभा मतदारसंघातील अनेक विषयांसह नांदेड शहर व जिल्ह्यातील काही मुद्द्यांकडे पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले. कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी वाहतूक नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीची आवश्यकता विषद करून शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातील दादागिरीच्या घटनांना आळा घालण्याची मागणी त्यांनी केली. या मागणीची तातडीने दखल घेत पोलीस प्रशासनाने आवश्यक पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, भोकर, हदगाव, देगलूर, कंधार, धर्माबाद, मुखेड आदी तालुक्यांमध्ये १० दिवसांपूर्वीच्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे नुकसान झालेल्या केळी उत्पादक व इतर शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत करण्याची मागणी त्यांनी केली. पंचनामे वेगाने पूर्ण केल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे आभार मानले. स्वयंचलित हवामान केंद्रांबाबत शेतकरी शंका व्यक्त करत असून, ही केंद्रे व्यवस्थित काम करत आहेत की नाही, याची तपासणी करण्याचीही मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी केली.

भोकर, अर्धापूर व मुदखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांसाठी नवीन वर्गखोल्या बांधकाम, जुन्या खोल्यांची दुरुस्ती, स्वच्छतागृहे, शाळांना संरक्षण भींती, स्वयंपाक गृह, भोजन व्यवस्थेची जागा, डेस्क–बेंच, संगणक व इंटरनेट सुविधेसह डिजिटल रुम, ग्रंथालय, अभ्यासिका, सीसीटीव्ही, आवश्यकतेप्रमाणे शिक्षक व शिक्षतेकर कर्मचाऱ्यांची उपलब्धता तसेच शाळेच्या जवळपास डीपी असेल तर त्याला तारेचे कुंपण करावे, अशी मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी या बैठकीत केली.

मुदखेड तालुक्यातील पार्डी वैजापूर येथील दत्त मंदीर, भोकर तालुक्यातील कांडली येथील महादेव मंदीर व अर्धापूर तालुक्यातील पाटणूर येथील अपरंपार महादेव मंदिर व परिसराच्या विकासासाठी निधी देणे, भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात २ नवीन डायलेसीस मशीनची उपलब्धता, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रावर निर्माण होणाऱ्या वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याची व्यवस्था, विजेच्या तक्रारींचे गतीमान निराकरण, राज्य रस्ते परिवहन मंडळाच्या फेऱ्या व सुविधा वाढवणे, लष्कर व पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी रनिंग ट्रॅक, शासकीय इमारतींमध्ये रेन हार्वेस्टिंग व सोलर पॅनलची व्यवस्था करणे आदी मागण्या आ. श्रीजया चव्हाण यांनी यावेळी मांडल्या.

# दिव्यांगांचा शंभर टक्के निधी खर्च करणार –पालकमंत्री अतुल सावे



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील सकल दिव्यांगांच्या विविध प्रश्नांसाठी दिव्यांग संघटनेच्या वतीने पालकमंत्री अतुल सावे यांचा घेराव घालण्याचा इशारा दिला होता. परंतु पोलीस प्रशासनाने मध्यस्थी करून सकल दिव्यांगांना पालकमंत्री यांची भेट घडवून आणली. त्यानुसार दिव्यांगांच्या शिष्टमंडळासह पालकमंत्री अतुल सावे यांनी हा निधी १०० टक्के खर्च करणार असल्याचे दिव्यांग संघटनेशी बोलताना सांगितले.

जिल्हा नियोजन भवन येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील सकल दिव्यांगांसाठी शासनाचा निधी संपूर्ण खर्च करून त्यांचे पुनर्वसन करून छोट्या मोठ्या उद्योगांना निधी देऊन दिव्यांगांना मदत करून निधी उपलब्ध करून शंभर टक्के खर्च करणार असे आदेश बैठकीमध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी देऊन सकल दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष राहुल साळवे यांना दिले.

यावेळी चंपतराव डाकोरे, सुनिल जाधव, शिवाजी सुर्यवंशी, सईद वैद्य, मोहसिन खान, कार्तिक कुमार भरतिपुरम, सय्यद आतिक, शेख मतीन, सय्यद आरिफ, प्रेमकुमार वैद्य, अजय गोरे, प्रशांत हणमंते, मुंजाजी कावळे, शेख अलीम, शेख रफिक, भाग्यश्री नागेश्वर, कल्पना सकते, सविता गवते यासह अनेक दिव्यांग उपस्थित होते.

# श्री संत साधू महाराज पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**लोहा (प्रतिनिधी)**– तिनशे वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री संत साधू महाराज दिंडीचे दि. (१९) रोजी लोहा मुक्कामानंतर दि.२० जून रोजी सकाळी आषाढी एकादशी वारी साठी विठू माउली च्या गजरात पंढरपूर कडे प्रस्थान झाले. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी हभप लक्ष्मीकांत महाराज लोहेकर, माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार,माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष शरद पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक संभाजी चव्हाण, नगरसेवक आप्पाराव पवार, केशवराव पवार, बंडु पाटील पवार आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, लक्ष्मीकांत बच्चेवार, तुकाराम सावकार, संजय मक्तेदार, रमेश कोटलवार, विजयकुमार चन्नावार, विलास चुडावकर, बाळू चुडावकर, गिरीश चन्नावार, बाळू पालीमकर, शंकर शेटे, नागेश दमकोडवार, पंकज मोटरवार,व्यंकट जंगले व असंख्य भक्तांनी मनोभावे दर्शन घेतल्यानंतर पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

आषाढी एकादशी वारीसाठी विठू माउलीच्या गजरात साधू महाराज संस्थानचे आठवे वंशज मठाधिपती एकनाथ महाराज कंधारकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी चालक ज्ञानेश्वर महाराज यांच्या नेतृत्वाखाली पायी दिंडी पंढरपूरकडे निघाली.

यंदा पायी दिंडीचे वेगळेपण म्हणजे वारकरी, भाविक–भक्त, महिला , पुरूष यांच्या नजरेस चांदीचा रथ पालकी व पादुका चटकन लक्ष वेधून घेत होते. महिलांच्या डोक्यावर कलश, तुळशी तर वारकरी हाती भगवा पताका, गळ्यात तुळशीची माळा, खांद्यावर विणा, मृदंग वादकांच्या हाती मृदंग अन् टाळकरी टाळ घेऊन ज्ञानोबा – तुकोबाच्या, विठू नामाच्या रामकृष्ण हरीच्या जयघोषात तल्लीन झाले होते.

दिंडी मार्गस्थ होतांना यावेळी जागोजागी अल्पोपहार व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गजानन गड्डम, डॉ.लोहेकर यांनी वारकऱ्यांची भोजनाची व्यवस्था केली. तर गजानन कळसकर कळसकर बंधूंनी अल्पहाराचे पाकीट दीले या प्रसंगी माजी नगरसेवक उत्तम महाबळे, सामाजिक कार्यकर गोविंद वड,पांडुरंग रहाटकर, सुरेश वैभव हाके, काशिनाथ शेटे, नागन पालाकूटे, विश्वनाथ भालेराव,साई शिंदे, हरीभाऊ वड्डे, आकाश शेंडगे, निलेश देशमाने, अझर शेख, सतिश मोरे, संदीप राजकौर, माधवराव पाटील पवार यांच्यासह अनेक भक्तांची उपस्थिती होती.

# नांदेडमधील अंमली पदार्थांचा साठा शोधून काढा

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.रवींद्र चव्हाण यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहर व जिल्ह्यातील अनेक मेडिकल स्टोअर्समध्ये परराज्यातून छुप्या पद्धतीने आलेले अंमली पदार्थांची (नशेच्या गोळ्या) सर्रासपणे विक्री होत असल्याची माहिति असून या पदार्थांचे सेवन करणारे चार युवक आढळले आहेत. हा प्रकार अतिशय गंभीर असल्याने शहरातील अंमली पदार्थांचा साठा शोधून काढावा, अशी मागणी खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली.

शुक्रवार दि.२० जून रोजी पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. खा. रवींद्र चव्हाण यांनी शहरातील मेडिकल स्टोअर्सवर सर्रासपणे नशेच्या गोळ्या मिळत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. विशेष म्हणजे या नशेच्या गोळ्या परराज्यातून शहरात छुप्या पद्धतीने आयात होत असून नशेच्या आहारी जावून विद्यार्थी तसेच युवकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. खा. चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नाच्या उत्तरात अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्याने शहरात असे एक प्रकरण घडल्याची कबुली देतानाच ज्या मेडिकल स्टोअर्समधून ४ युवकांनी नशेच्या गोळ्या खरेदी केल्या, त्या मेडिकलचा परवाना रद्द केल्याचीही माहिती बैठकीत दिली.

खा. रवींद्र चव्हाण यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागणीनुसार कृषीपंपासाठी सोलार पंप उपलब्ध करून देण्यात यावेत, तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशीही मागणी केली. याशिवाय इतर शहरांच्या धर्तीवर नांदेडमध्ये शहर परिवहन बससेवा तात्काळ सुरु करावी, अशीही मागणी लावून धरली. जिल्ह्यात जलजीवन योजनेची कामे अर्धवट अवस्थेत असताना ते पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवून देयके उचलण्यात आली. अद्याप अनेक गावांमध्ये या योजनेच्या माध्यमातून पाण्याचा एकही थेंब मिळालेला नाही. शिवाय पूर्ण झालेल्या योजनेचे संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरणही झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

या सर्व प्रकाराची चौकशी करावी, अशीही मागणी त्यांनी केली. नियोजन समितीच्या मागील बैठकीत जिल्ह्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या किती स्मशानभूमी मंजुर झाल्या, त्याचीही माहिती देण्याची मागणी खा. रवींद्र चव्हाण यांनी केली.

# सुगंधाबाई मोरे यांचे निधन



**शंकरनगर (प्रतिनिधी)**– किनाळा (ता.बिलोली) येथील शतकोत्तरी महिला सुगंधाबाई चांदोबा मोरे यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी शुक्रवारी दि. २० जून रोजी दुपारी दोनच्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी दि. २१ रोजी सकाळी ११ वाजता किनाळा येथे करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातू, नाती असा परिवार आहे. पत्रकार यशवंत मोरे यांच्या मातोश्री तर जिल्हा परिषद हायस्कूल धनगरवाडी शाळेचे केंद्रप्रमुख विकास मोरे यांच्या त्या आजी होत.

# राष्ट्रीय पुरोगामी भोकर पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

**भोकर (प्रतिनिधी)** – राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांच्या संमतीने व राज्य कार्याध्यक्ष शंकरसिंह ठाकूर यांच्या सूचनेवरून संपादक उत्तम बाबळे यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर भोकर तालुका अध्यक्षपदी गंगाधर पडवळे, सचिवपदी बालाजी कदम यांची निवड करण्यात आली आहे.

मंगळवारी दि. १७ जून रोजी येथईल शासकीय विश्राम गृहात झालेल्या बैठकीत राज्य कार्याध्यक्ष शंकरसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत मागील वर्षीचा अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर नूतन कार्यकारिणी निवडीचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर सर्वानुमते गंगाधर पडवळे यांची तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्ष प्रा. राहुल कदम, सचिव म्हणून बालाजी कदम, उपाध्यक्ष साईनाथ बंडोड, कोषाध्यक्ष विशाल जाधव, समन्वयक विनय दुर्केवार सहसचिव भावीन, संघटक, गजानन गाडेकर, सहसंघटक मनोज राठोड, तर सदस्य म्हणून संभाजी कदम, श्रीकांत बाबळे, निळकंठ पडवळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी मराठवाडा उपाध्यक्ष संपादक मारोती शिकारे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश राठोड, शुभमसिंह ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ तालुका शाखा भोकर च्या सर्व पदाधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती.

सदरील बैठकीत राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांची संकल्पना कार्य याची जाणीव सर्व संघातील सदस्यांना करून दिली त्याचबरोबर कार्य उद्दिष्ट आणि कर्तव्य, अधिकार याचेही वाचन सर्वांसमोर करण्यात आले. यानंतर पत्रकार म्हणून समाजात वावरत असताना अनेक संकटांशी सामना करावा लागतो त्याचबरोबर परिवाराही जपावा लागतो यासाठी पत्रकार संघ शासन स्तरावरून पत्रकारांच्या हिताचे निर्णय त्याचबरोबर फायदे करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही सांगण्यात आले.




**मुखेड** : भारत निवडणूक आयोगाच्या वतीने दिल्ली येथे बीएलओ प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये मुखेड विधानसभा मतदारसंघातून जिजामाता माध्यमिक विद्यालय जाहूर येथील कर्मचारी गोविंद इंगळे यांचा सदरील प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे सहाय्यक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल मुंबई यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. **(छाया : गणेश आंबेकर)**

# शासकीय आदिवासी वसतीगृहात विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी; पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेतूनही प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी किनवट प्रकल्पाअंतर्गत मुलींचे ६ व मुलांचे ९ असे एकुण १५ शासकीय वसतीगृह कार्यरत आहेत. शैक्षणिक सत्र २०२५–२६ या शैक्षणिक सत्रासाठी आदिवासी मुला–मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आली आहेत, असे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

किनवट प्रकल्पातील जिल्हास्तर वसतीगृहामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन, पदवी, पदवीत्तर, डिप्लोमा व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आणि तालुकास्तर वसतीगृहामध्ये इयत्ता ८ वी ते कनिष्ठ महाविद्यालयीन, पदवी, पदवीत्तर, डिप्लोमा व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांनी निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत ऑनलाईन परिपूर्ण कागदपत्रासह http://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत.

प्रवेशाची प्रक्रिया गुणवत्ता तथा शासन नियमानुसार करण्यात येईल. वसतीगृहात रिक्त जागेच्या अधिन राहुनच प्रवेश देण्यात येईल ज्या विद्यार्थ्याचा वसतीगृहात प्रवेश होणार नाही. अशा विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वंयम योजनेत वसतीगृह प्रवेश संपल्यावर वळती करण्यात येणार आहे. परंतु त्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन वसतीगृहाचा अर्ज करतानांच पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना (चेक बॉक्स क्लिक करुन) निवड करणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांनी वसतीगृह प्रवेशाकरीता मुदतीत आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज भरण्यात यावा. विद्यार्थ्याचे आधार प्रमाणिकरण असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचे आधार नंबर व बँक खाते नंबरचे सिंडिग असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्याचे आधार सिंडिग नसल्यास त्या विद्यार्थ्यांनी संबधित बँकेशी संपर्क करुन आधार सिंडिंग करुन घेणे आवश्यक आहे. तरच डीबीटीचा लाभ मिळेल अन्यथा उ्रढ चा लाभ मिळणार नाही असे आवाहन करण्यात आले आहे.

वसतीगृहातील मंजुर क्षमता व रिक्त जागेची माहिती पुढीलप्रमाणे आहे. अधिक माहितीसाठी संबंधित वसतीगृहाचे गृहपाल किंवा प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# यशवंत महाविद्यालयात बी.ए. मानसशास्त्र विषयाला मान्यता

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५– २६ पासून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. १४ जून २०२५ रोजी प्रकाशित शासन निर्णयानुसार बी.ए. अभ्यासक्रमांतर्गत मानसशास्त्र या विषयास मान्यता प्राप्त झाली आहे.

मानसशास्त्र हा विषय आधुनिक काळात विविध क्षेत्रात महत्वपूर्ण असून समुपदेशन, आरोग्यसेवा व संशोधन क्षेत्रात याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विविध खाजगी आस्थापनांमध्ये समुपदेशक, कौटुंबिक समुपदेशक, न्यायालय, दक्षता समिती, पोलीस प्रशासन, तुरुंग व्यवस्थापन, औद्योगिक संस्थांमध्ये देखील संधी आहे. मानसशास्त्रामध्ये पदवी, पदव्युत्तर, डॉक्टरेट व डिप्लोमा करून शासकीय व खाजगी संस्थांमध्ये नोकरीला भरपूर वाव आहे.

बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी बी. ए. प्रथम वर्षात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रवेश घेताना मानसशास्त्र हा विषय घ्यावा, असे आवाहन माजी प्र– कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे, मानव विज्ञान विद्याशाखा प्रवेश प्रक्रिया प्रमुख उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील आणि अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील यांनी केले आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या...

# उठसूट कोणतेही फोटो अन् व्हिडीओ शेअर करताय? तुरुंगात जावे लागेल!



**सोशल मीडियाच्या युगात फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म आहेत. जिथे रोज करोडो फोटो आणि व्हिडीओ शेअर केले जातात. पण कधी कधी असे करणे महागात पडते आणि तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत, फोटो आणि व्हिडीओ ऑनलाइन शेअर करण्याचे नियम तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे, अन्यथा तुम्ही कायद्याच्या जंजाळात अडकू शकता. व्हिडीओ आणि फोटो शेअरिंगबाबत भारतात अनेक कायदे आहेत, त्यांचे उल्लंघन केल्यास तुरुंगात जावे लागू शकते. चला सविस्तर जाणून घेऊया...**

- माहिती तंत्रज्ञान कायदा २००० : हा कायदा फोटो, व्हिडिओ, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी, कॉपी राईट्स यांसारख्या बाबी हाताळतो. जर तुम्ही वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय असे कोणतेही दस्तऐवज शेअर केले तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते.
- माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ : हा नियम इंटरनेट प्लॅटफॉर्मद्वारे पोस्ट केलेल्या आणि होस्ट केलेल्या सामग्रीशी संबंधित आहे. याचा अर्थ इंटरनेट प्लॅटफॉर्मला वापरकर्त्याची गोपनीयता आणि नग्नतेची काळजी घ्यावी लागेल.
- द्वेषयुक्त भाषण कायदा, १९५६ : या कायद्यांतर्गत एखाद्याला ऑनलाइन अपमानास्पद किंवा असभ्य भाषा वापरल्याबद्दल शिक्षा होऊ शकते.
- गुन्ह्यांपासून महिलांचे संरक्षण आणि लैंगिक छळ कायदा, २०१३ : या नियमानुसार महिलांवरील लैंगिक छळ आणि लैंगिक अत्याचार हा गुन्हा आहे.

### फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर जेल कधी होणार ?

- एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करते तेव्हा...
- कोणत्याही व्यक्तीला बदनाम करते किंवा त्यांना मानसिक वेदना देते तेव्हा...
- अश्लील भाषा किंवा लैंगिकदृष्ट्या सुस्पष्ट सामग्री पोस्ट करता तेव्हा...
- मुलांचे लैंगिक शोषण किंवा अत्याचाराचे चित्रण घडते तेव्हा...
- हिंसा किंवा द्वेषयुक्त भाषण भडकवते तेव्हा...

### तक्रार कुठे करावी ?

- जर तुम्हाला वाटत असेल की एखादा व्हिडिओ किंवा फोटो कायद्याचे उल्लंघन करत आहे, तर तुम्ही सायबर क्राईम तक्रार पोर्टलवर तक्रार करू शकता: https://cybercrime.gov.in/
- तुम्ही राष्ट्रीय महिला आयोग येथेदेखील तक्रार नोंदवू शकता. http://ncw.nic.in/
- किंवा तुमचे स्थानिक पोलिस स्टेशन.



# तुमचा WiFi पासवर्ड विसरलात? काळजी नको... आम्ही सांगतो ते करा...



**जर तुम्ही वायफाय वापरत असाल आणि पासवर्ड शोधण्यात अडचण येत असेल किंवा तुम्ही तुमचा वायफाय पासवर्ड विसरला असाल तर काळजी करण्याची गरज नाही. आम्ही तुम्हाला काही सोप्या युक्त्या सांगणार आहोत. त्याच्या मदतीने तुम्हाला वायफाय पासवर्ड लक्षात ठेवणे खूप सोपे होईल. याशिवाय तुम्हाला पासवर्ड कुणासोबत शेअर करायचा असेल तर तुम्हाला या सोप्या पद्धती फॉलो कराव्या लागतील...**

### Android फोनमध्ये कसे शोधायचे ?

अँड्रॉईड फोनमधील वायफायचा पासवर्ड जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. यामध्ये तुम्हाला WiFi चा पर्याय दिसेल. इथे गेल्यावर तुम्हाला भरपूर वायफाय दिसेल. आता तुम्हाला जाणून घ्यायच्या असलेल्या कोणत्याही वायफाय नेटवर्कच्या पासवर्डची माहिती तुम्ही शेअर करू शकता किंवा मिळवू शकता. वायफाय नेटवर्कवर गेल्यावर तुम्हाला शेअर किंवा वायफाय क्यूआर कोडचा पर्याय दिसेल. हे केल्यानंतर, तुमच्या स्क्रीनवर QR कोड दिसू लागेल. येथे तुम्हाला WiFi पासवर्ड देखील दिसेल. आता अशा परिस्थितीत, जर एखाद्या वापरकर्त्याला वायफाय कनेक्ट करायचे असेल तर त्याला फक्त हा QR कोड स्कॅन करावा लागेल.

### आयफोन वापरकर्ते कसे कनेक्ट करू शकतात ?

जर तुम्ही आयफोन वापरकर्ता असाल तर प्रक्रिया थोडी वेगळी असणार आहे. यामध्येही सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल आणि नंतर वायफाय पर्यायावर जावे लागेल. यानंतर तुम्हाला कनेक्टेड नेटवर्क पर्यायावर जावे लागेल. यामध्ये तुम्हाला एक छोटा 'i' आयकॉन दिसेल. यावर क्लिक केल्यानंतर तुम्हाला फेस आयडी किंवा टच आयडीच्या पर्यायावर जावे लागेल. हे केल्यानंतर, तुम्हाला ऑटो-जॉइन पर्यायाच्या खाली नेटवर्क पासवर्ड दिसेल. ते सेव्ह केल्यानंतर, तुम्ही ते इतर वापरकर्त्यांसोबत शेअर करू शकाल. वायफाय कनेक्शनबाबतही तुम्हाला खूप सावध राहण्याची गरज आहे. एक चूक तुम्हाला त्रास देऊ शकते. त्यामुळे वायफाय पासवर्ड शेअर करताना खूप काळजी घ्यावी लागेल.

# व्हॉट्सॲप अलर्ट! तुमचे खाते आपोआप लॉग आउट झालेय ?

**तुम्ही जर व्हॉट्सॲप वापरत असाल तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे, कारण व्हॉट्सॲपमध्ये एक बग समोर आला आहे, जो व्हॉट्सॲपच्या सुरक्षेसाठी धोकादायक मानला जात आहे. या बगमुळे व्हॉट्सॲप अकाउंट आपोआप लॉग आउट होत आहे. सोशल मीडिया वापरकर्ते अनेक व्हॉट्सॲप अकाउंट्स X वर लॉग आउट झाल्याची तक्रार करत आहेत. अशा परिस्थितीत हे कसे टाळता येईल हे जाणून घेऊया ?**

### तक्रार काय आहे ?

व्हॉट्सॲप अकाऊंट लॉगआऊट झाल्याच्या बहुतांश तक्रारी डेस्कटॉपवर येत आहेत. साधारणपणे, WhatsApp खात्यातून लॉग आउट केल्यानंतर, पुन्हा लॉगिन करण्यासाठी ६ अंकी OTP आवश्यक आहे. तथापि, बगमुळे हे होत नाही. अशा परिस्थितीत हा सुरक्षेचा मोठा धोका मानला जात आहे. अँड्रॉइड, आयओएस आणि वेब यूजर्स या बगबद्दल तक्रार करत आहेत.

### संरक्षण कसे करावे ?

व्हॉट्स ॲप सपोर्ट पेजनुसार, ही सुरक्षा समस्या आहे. सध्या हा बग टाळण्यासाठी व्हॉट्सॲपकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तथापि, तुम्ही तुमच्या सुरक्षिततेसाठी टू फॅक्टर ऑथेंटिकेशन प्रोसेस अवलंबू शकता.



### टू फॅक्टर ऑथेंटिकेशन कसे चालू करावे ?

- सर्व प्रथम WhatsApp उघडा. यानंतर सेटिंग ऑप्शनवर टॅप करा.
- त्यानंतर तुम्हाला अकाउंट ऑप्शनवर टॅप करावे लागेल.
- यानंतर तुम्हाला टू फॅक्टर ऑथेंटिकेशन पर्यायावर टॅप करावे लागेल.
- यानंतर खाते सुरक्षित करण्यासाठी ६ अंकी कोड टाकावा लागेल.
- यासोबतच ईमेल टाकावा लागेल आणि ईमेलची पडताळणी करावी लागेल.
- यानंतर, जेव्हा तुमचे व्हॉट्सॲप खाते लॉग आउट होईल, तेव्हा तुम्हाला सिक्युरिटी पिन टाकावा लागेल.

# पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे?

**पासपोर्ट हा एक व्हर्चुअल दस्तऐवज आहे, जो राष्ट्रीय ओळखीचा पुरावा म्हणून ओळखला जातो. सुट्टी, नोकरी किंवा शिक्षणासाठी दुसऱ्या देशात जाण्यासाठी पासपोर्ट आवश्यक आहे. तथापि, पासपोर्टची वैधता देखील आहे. तथापि, पासपोर्टची वैधता १० वर्षे आहे. यानंतर पासपोर्टचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. पासपोर्टची वैधता संपण्यापूर्वी ९ महिने आधी त्याचे नूतनीकरण केले पाहिजे. तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्यास ५ वर्षांनंतर पासपोर्टचे नूतनीकरण करावे लागेल. मात्र, पासपोर्टचे नूतनीकरण सहज करता येते. त्याची प्रक्रिया जाणून घेऊया...**




### कोणती कागदपत्रे लागतील ?


- वैध पासपोर्ट
- तुमच्या वर्तमान पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठाची छायाप्रत असणे आवश्यक आहे.
- ईसीआर/नॉन-ईसीआर पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत
- पत्त्याचा पुरावा
- वैधता विस्तार पृष्ठाची छायाप्रत
- कोणत्याही निरीक्षण पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत

### पासपोर्ट नूतनीकरण शुल्क

- १० वर्षांची वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते.
- १० वर्षांच्या वैधतेच्या ६० पानांच्या पासपोर्टसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क भरावे लागते.
- १८ वर्षांखालील मुलांसाठी ५ वर्षे वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टची फी १००० रुपये आहे, तर तत्काळसाठी २००० रुपये भरावे लागतील.
- १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी १० वर्षांच्या वैधतेसह ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागेल, तर तत्काळसाठी २००० रुपये द्यावे लागतील.

### पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे...

- पायरी १ : पासपोर्ट सेवा वेबसाइटला भेट द्या.
- पायरी २ : नोंदणी पूर्ण झाल्यास, तुमच्या आयडीने लॉग इन करा.
- पायरी ३ : लॉगिन क्रेडेन्शियल्ससह पोर्टलवर प्रवेश करा.
- पायरी ४ : यानंतर Apply for a New Passport/Re-issue of Passport पर्यायावर टॅप करा.
- स्टेप ५ : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे बरोबर आहेत या पर्यायावर क्लिक करा.
- पायरी ६ : नंतर पेमेंट आणि शेड्यूल पर्याय निवडा.
- पायरी ७ : यानंतर पेमेंट पूर्ण करा.
- पायरी ८ : यानंतर फॉर्म सबमिट करा.
- पायरी ९ : त्यानंतर ॲप्लिकेशन प्रिंट करण्याचा पर्याय निवडा.
- पायरी १० : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे आणि तुमच्या सबमिट केलेल्या अर्जासह नियोजित तारखेला जवळच्या पासपोर्ट सेवा केंद्रावर जा.



# फोन हॅकिंग : फोनवर हे 7 चिन्ह दिसले तर होतेय हेरगिरी!




**इंटरनेटच्या जमान्यात फोन हॅक होण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसेच, प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रवेश होत आहे, त्यामुळे फोन हॅक करणे सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत, तुमचा फोन हॅक झाला आहे हे तुम्हाला कसे कळेल ? खरं तर, आज आम्ही तुम्हाला काही चिन्हे सांगणार आहोत, ज्याद्वारे तुम्ही समजू शकता की तुमचा फोन हॅक झाला आहे...**

- बॅटरी आयुष्य : जर तुमच्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होत असेल, तर तुमचा फोन हॅक झाला असण्याची शक्यता आहे. कारण काहीवेळा बॅकग्राउंडमध्ये चालणाऱ्या हेर ॲप्समुळे फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. अशा परिस्थितीत फोनच्या बॅटरीकडे लक्ष देण्याची गरज आहे.
- फोनवर अनावश्यक ॲप्स : तुम्ही तुमच्या फोनमध्ये ॲप्सचा तपशील ठेवावा. जेणेकरून तुमच्या परवानगीशिवाय तुमच्या फोनवर कोणतेही ॲप इंस्टॉल होणार नाही. असे झाल्यास फोन हॅक होऊ शकतो. या अज्ञात ॲप्समध्ये गुप्तचर सॉफ्टवेअर असू शकते.
- डिव्हाइस जास्त गरम करणे : हेरगिरी करणारे ॲप्स सहसा यासाठी जीपीएस प्रणाली वापरून रिअल टाइममध्ये डिव्हाइसचे स्थान ट्रॅक करतात. अशा परिस्थितीत तुमच्या फोनच्या हार्डवेअरवर जास्त दबाव येतो. त्यामुळे जास्त गरम होण्याची समस्या उद्भवते.
- डेटा वापरात वाढ : जर तुमचा फोन ट्रॅक केला असेल तर डेटाचा वापर अचानक वाढतो. अशा परिस्थितीत डेटा वापरात अचानक वाढ होत असेल, तर तुम्ही सतर्क राहायला हवे.
- डिव्हाइस खराबी : जेव्हा फोन हॅक होतो, तेव्हा स्क्रीन फ्लॅशिंग, स्वयंचलित फोन सेटिंग्ज बदलणे किंवा फोन काम करत नाही, डिव्हाइस खराब होणे यासारख्या घटना दिसू शकतात.
- कॉल करताना पार्श्वभूमी आवाज : काही गुप्तचर ॲप्स फोन कॉल रेकॉर्ड करतात. अशा परिस्थितीत, जेव्हा फोन कॉल दरम्यान कोणताही पार्श्वभूमी आवाज ऐकू येतो तेव्हा एखाद्याने सावध राहावे, कारण हे हॅकिंगचे लक्षण असू शकते.
- अनावश्यक ब्राउझिंग हिस्ट्री : ट्रॅकिंग किंवा गुप्तचर अनुप्रयोग डाउनलोड करण्यासाठी लिंक केलेल्या वेबसाइट शोधण्यासाठी आपल्या डिव्हाइसच्या ब्राउझिंग इतिहासाचे निरीक्षण करा.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी नऊ टक्के व्याजदराने कर्ज –मुख्यमंत्री

## विविध विकास महामंडळ आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संयुक्त उपक्रम



**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना तसेच विविध महामंडळाअंतर्गत सुरू असलेल्या योजनेमार्फत शासन महिलांचे आर्थिक सबलीकरण करीत आहे. या लाभार्थी महिलांना आता आर्थिकरित्या अधिक सक्षम करण्यासाठी नऊ टक्के अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शासनामार्फत सुरू असलेल्या महिलांसाठीच्या व्याज परतावा योजनेची मुंबई बँकेच्या कर्ज योजनेसह सांगड घालून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासंदर्भात वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार तथा मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार चित्रा वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, महामंडळाचे प्रतिनिधी, सहसचिव वि. रा. ठाकूर, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे आदिसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महिलांना स्वयंपूर्ण उद्योजक बनविण्यासाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी महामंडळ आणि 'मुंबै बँक संयुक्तपणे हा उपक्रम राबविणार आहे. मुंबईतील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना आर्थिक साक्षर करण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक व सामुहिक कर्ज देऊन त्यांना उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी मदत केली जाईल. तसेच पर्यटन संचालनालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत विविध वैयक्तिक व गट कर्ज योजना राबविण्यात येतात. यामुळे महिलांना स्वत:चा व्यवसाय व उद्योग सुरू करण्यासाठी नऊ टक्के इतक्या अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आमदार प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना सुक्ष्म, लघू उद्योजक बनवून त्यांचे आर्थिक सबलीकरण करण्यात येणार असल्याचे यावेळी नमुद केले. मुंबै बँकेच्या विशेष कर्ज धोरण अंतर्गत वैयक्तिक व गटाला एक लाख व त्यापेक्षा जास्त कर्ज नऊ टक्के दराने अदा करण्यात येईल. मुंबई शहर आणि उपनगर येथे १६ लाख इतके लाभार्थी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्रातील स्टार्टअप्स्ना आता गुगलचे बळ मिळणार –मंत्री लोढा

## जागतिक स्तरावरच्या संधी उपलब्ध होणार



**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय स्टार्टअप्सना माहिती क्षेत्रातील जागतिक कंपनी गुगलचे बळ मिळणार असून या स्टार्टअप्सना उद्योगासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात संधी उपलब्ध होणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. गुगलच्या व्हेंचर कॅपिटल अँड सेटअप पार्टनरशिप विभागाचे प्रमुख डॉ.अपूर्व चॅमरिया यांनी मंत्री लोढा यांची मंत्रालयातील दालनात भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली.

महाराष्ट्रातीलस्टार्टअप्सना जागतिक स्तरावर नेण्यासाठी मंत्री लोढा प्रयत्नशील आहेत. या अनुषंगाने माहिती क्षेत्रातील अग्रगण्य जागतिक कंपनी गुगलच्या सहकार्याने महाराष्ट्रात उद्योगाच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. यावेळी कौशल्य विभागाचे आयुक्त लहुराज माळी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे बैठकीला उपस्थित होते.

जगातल्या नऊ देशात गुगलद्वारे एआय प्रशिक्षण सेंटर्स कार्यरत आहेत. स्टार्टअप्स करिता भारतातही अशाप्रकारचे सेंटर स्थापन करण्याचे नियोजन करत असल्याची माहिती यावेळी गुगलचे अधिकारी चॅमरिया यांनी दिली.

निवड प्रक्रियेद्वारे उत्कृष्ट ठरणाऱ्या स्टार्टअप्सना यात संधी मिळणार आहे. देशात अशा प्रकारचे हे पहिलेच केंद्र ठरणार असून महाराष्ट्रातील नव्या उमेदीने उद्योग करू पाहणाऱ्या युवकांना या निमित्ताने जागतिक कवाडे उघडणार असल्याचा विश्वास यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. सध्या यासंदर्भात प्राथमिक चर्चा सुरु असून लवकरच सामंजस्य करार होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान एकीकडे स्टार्टअप्ससाठी सेंटर तर आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे अभ्यासक्रम ही महाराष्ट्रात सुरु करण्याची तयारी गुगलने दाखवली आहे.

# मंत्रालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**मुंबई (प्रतिनिधी) –** मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगा प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. 'इन्स्टिट्युट ऑफ योगा' यांच्या सहयोगाने आयोजित या प्रात्यक्षिक कार्यक्रमासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, इन्स्टिट्युट ऑफ योगाचे सह संचालक ऋषी योगेश यांच्यासह विविध विभागांचे सचिव, उपसचिव, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी इन्स्टिट्युट ऑफ योगाच्या मार्गदर्शकांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच योगाच्या महत्त्वाविषयी माहिती दिली. यावेळी पर्वतासन, शवासन यासारख्या योगांची प्रत्यक्षिके उपस्थितांनी केली. तसेच अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धामध्ये सुवर्ण पदक विजेते मंत्रालयीन अधिकारी जगन्नाथ लांडगे, दत्ताराम सावंत आणि योगिता जाधव यांनी योग प्रात्यक्षिके सादर केली.

# ॲक्सिओम–४ मिशनचे उद्या होणारे लाँचिंग लांबले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणारे ॲक्सिओम–४ मिशनची तारीख परत पुढे ढकलण्यात आली आहे. हे मिशन २२ जूनला लाँच होणार नाही. नासाकडून या मिशनला ही स्थगिती देण्यात आली आहे. लवकरच याची नवी तारीख जाहीर केली जाणार आहे.

याआधी वेगवेगळ्या तांत्रिक कारणांमुळे मागील काही दिवसांत ही मोहीम वारंवार पुढे ढकलली जात होती. आधी प्रतिकूल हवामानामुळे, नंतर यानातील वायू गळती सुरू झाल्याचे लक्षात आल्यामुळे मोहीम पुढे ढकलण्यात आली होती. मोहीम सुरळीत आणि सुरक्षितरित्या व्हावी यासाठी खबरदारी घेतली जात आहे. किरकोळ चूक नंतर जीवघेणी ठरू शकते. यामुळेच तांत्रिक दोष लक्षात येताच ते दूर करण्यासाठी मोहीम काही काळ पुढे ढकलली होती.

# 'एचएसआरपी' नंबरप्लेट बसवण्यासाठी शेवटची संधी; १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**मुंबई(प्रतिनिधी) –** अनेक वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट (लावण्याची मुदत परिवहन विभागाने वाढवली आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. परंतू ही मुदतवाढ १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतलेला आहे. वाहनधारकांना ही शेवटची संधी असल्याने वाहनधारकांनी त्वरित क्ड्ठझ नंबरप्लेट बसवावी असं आव्हान परिवहन विभागाने केले आहे.

अनेक वाहनधारकांना क्ड्ठझ नंबरप्लेट बसवण्यासाठी विलंब होत असून परिवहन विभागाच्या निदर्शनास आल्याने ही संधी शेवटची देण्यात आली आहे. यापूर्वी वाहनधारकांना ऑनलाईन बुकिंग तांत्रिक अचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे परिवहन विभागाने तांत्रिक अडचणींमधील दुरुस्ती करुन मुदतवाढ देण्यात आली . यापूर्वी देखील HSRP नंबरप्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली. पहिली मुदतवाढ ३० जून तर दुसरी मुदतवाढ ३० एप्रिल २०२५ पर्यंत देण्यात आली. परिवहन विभागाच्या आयुक्तांच्या माहितीनुसार १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या वाहनधारकांना अडणीत येत असतील त्यांनी जवळच्या अधिकृत सेंटरमध्ये संपर्क साधावा, संपर्क साधणं शक्य नसेल तर तर वेबसाईटवर ऑनलाईन बुकिंग करावी. असे आवाहन परिवहन विभागाच्या आयुक्तांनी केलं आहे.

# जिल्ह्यातील खेळाडूंना क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशाची संधी

**लातुर (प्रतिनिधी) –** महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने राज्याच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत २०२५–२६ साठी पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, नाशिक, अकोला, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली येथील क्रीडा प्रबोधिनींमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. यामध्ये हॅण्डबॉल, जलतरण, सायकलिंग, फुटबॉल, ज्युदो आणि जिम्नॅस्टिक्स या खेळांसाठी निवासी आणि अनिवासी प्रवेश २६ ते २७ जून २०२५ दरम्यान ५० टक्के लेखी चाचणी आणि ५० टक्के कौशल्य चाचणीच्या आधारे दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर पदकप्राप्त किंवा राष्ट्रीयस्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व केलेले १९ वर्षांखालील खेळाडू तज्ज्ञ समितीसमोर चाचणी देऊन सरळ प्रवेशासाठी पात्र ठरतील.

राज्यस्तरावर सहभागी १९ वर्षांखालील खेळाडूंना खेळनिहाय कौशल्य चाचणीत गुणानुक्रमे प्रवेश निश्चित होईल. ७ जुलै २००६ नंतर जन्मलेले आणि ८ जुलै २०२५ पर्यंत १९ वर्षे पूर्ण झालेले खेळाडू प्रवेशास पात्र आहेत. क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशासाठी इच्छुक लातूर जिल्ह्यातील खेळाडूंनी २४ जून २०२५ पर्यंत मूळ क्रीडा प्रमाणपत्रासह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे कार्यालयीन वेळेत नाव नोंदणी करावी.

# ४० कोटींचा अतिवृष्टी अनुदान घोटाळा; सात तलाठीसह ५ तहसील क्लार्कची उचलबांगडी

**जालना (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील ४० कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणाची व्याप्ती वाढतच चालली आहे. आज (२० जून) पुन्हा या प्रकरणी ७ तलाठी आणि ५ तहसील क्लार्कचे निलंबन करण्यात आलं आहे. या घोटाळ्यात ५ तहसीलदार आणि नायब तहसीलदारांचा देखील समावेश आढळून आला आहे. त्यांचे देखील खुलासे मागवण्यात आले आहेत. दरम्यान आजच्या कारवाईनंतर या प्रकरणात आत्तापर्यंत १७ तलाठी आणि पाच तहसील कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. जालना जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी ही कारवाई केली असून या प्रकरणात आणखी ३५ तलाठ्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी मध्ये २०२२ ते २०२४ या कालावधीत बोगस शेतकरी दाखवून एकाच नावावर दुबार अनुदान उकळलं गेलं, तर जमीन नसताना देखील अनुदान हडप केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या कारवाईनंतर याचे धागेदोरे तहालीदारांपर्यंत पोहचले आल्याचे दिसत असून याप्रकरणी शासन स्तरावरून फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या सर्व प्रकरणाविषयी जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण नाथ पांचाळ यांनी माहिती दिली.

जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण नाथ पांचाळ यांनी माहिती दिलेल्या माहितीनुसार जालन्यातील ४० कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यात आणखी ७ तलाठी आणि ५ तहसील क्लार्कचे निलंबन करण्यात आलं आहे. आणखी ३५ तलाठ्यांविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. चौकशी अहवालामध्ये ५ तहसीलदारांवर कारवाईची शिफारस करण्यात आली असून त्यांचे खुलासे मागवले आहेत. या प्रकरणात यापूर्वी १० तलाठ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये तत्कालिन आणि कार्यरत तहसीलदारांवर देखील ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. जालन्याच्या अंबड आणि घनसावंगी तालुक्यात तहसीलदारांचे लॉगिन, पासवर्डचा गैरवापर करून तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकांनी अतिवृष्टी आणि गारपिटचे अनुदान हडप केल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी ८ सदस्यीय समिती नेमण्यात आली होती.


शिक्षण समिती बोधडी (बु.) संचलित

ADMISSION OPEN

शेडूल कास्ट हॉस्टेल बोधडी (बु.)



मोफत प्रवेश सुरू आहे.

सन २०२५–२६ या शेक्षणिक वर्षाकरीता इयता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना शासकिय नियमाप्रमाणे प्रवेश देणे चालू आहे.
प्रवेश टक्केवारी खालील प्रमाणे आहे

अ.क्र.जातीची टक्केवारी
१) एस.सी. ६७%
२) एस.टि. १४ %
३) व्ही.जे.एन.टी. १७ %
४) एस.बी.सी. ०२ %
५) ओ.बी.सी./ओपन २० %

वसतीगृहाची वैशिष्टे
१) प्रशस्त इमारत.
२) राहण्याची व जेवण्याची उत्तम व्यवस्था.
३) विशेष मार्गदर्शन.
४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राधान्य.
५) इयत्ता ५ वी ते १० वी सर्व विषयाच्या टयुशनची व्यवस्था.
६) प्रवेश घेताना आधार कार्ड,गुणपत्रक, आवश्यक असेल

सचिव
श्री सोपानराव ज्ञानोबा केंद्रे

अधिक्षक
श्री विश्वनाथ भिमराव वाडकर
मो. ९४२१९५४७२८


# देशात २ लाख नव्या प्राथमिक कृषी पतसंस्था; सहकारातून ग्रामीण परिवर्तनाला समृद्धीची दिशा –केंद्रीय मंत्री शहा

**मुंबई (प्रतिनिधी) –** सहकार से समृद्धी या आधारावर ग्रामीण भागात परिवर्तन घडवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. देशात २ लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (पॅक्स) स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्रत्येक गावात सहकारी संस्थांची माहिती डिजिटल डाटाबेसद्वारे संकलित करण्यात आली आहे. पॅक्स संस्थांना केवळ कृषीपुरते मर्यादित न ठेवता, २२ नव्या सेवा क्षेत्रांशी जोडण्यात येत आहे. यामध्ये जनऔषधी केंद्रे, गॅस वितरण, पेट्रोल पंप, रेल्वे तिकीट सेवा, टॅक्सी सेवा अशा सेवा क्षेत्रांचा समावेश आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सहकार परिषदेत केले.

मुंबईतील हॉटेल फेअरमोंट येथे 'सहकार से समृद्धी' राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री ड.माणिकराव कोकाटे, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार राज्यमंत्री पंकज भोईर, नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर, महाव्यवस्थापक अमित गोयल, व्यवस्थापकीय संचालक दीपक अग्रवाल, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री अमित शहा म्हणाले, अन्नदाता शेतकरी बांधवांना सक्षम करण्यासाठी देशात पहिल्यांदाच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. युनोने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले. संपूर्ण जगासाठी सहकार ही आर्थिक व्यवस्थेची संकल्पना म्हणून पाहिले जाते. परंतु भारतासाठी, सहकार पारंपारिक जीवनशैलीत रुजलेले तत्वज्ञान आहे. एकत्र येणे, विचार करणे, काम करणे, समान ध्येयाकडे पुढे जाणे, आनंदात आणि दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, हा भारतीय सहकाराचा आत्मा आहे. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक या राज्यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

# अपर मुख्य सचिव यांच्या हस्ते 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेच्या अंकाचे प्रकाशन

**मुंबई (प्रतिनिधी) –** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेच्या मे २०२५ या अंकाचे प्रकाशन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले.

यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या सहसचिव सुचिता महाडिक, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते. 'आपलं मंत्रालय' गृहपत्रिकेच्या अंकामध्ये मंत्रालयातील विविध विभागाचे अधिकारी–कर्मचारी यांनी लिहिलेल्या कथा, कविता, ललित लेख, सुलेखन मालिका, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, तंत्रज्ञानाची टेकवारी, मिशन आयगॉट कर्मयोगी, वेव्हज, या विषयीचे लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत.


## टी.सी.हरवली

माझी पानभोसे पूजाताई शंकरराव या नावाची बारावी पास आर्ट ( ई. स. २०१३) ची टी.सी. देगलूर ते पुणे या बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे.

**–संपर्क पत्ता –**
**पानभोसे पूजाताई शंकरराव मु. पो. नरंगल ता. देगलूर जि. नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी सत्यव्रत धोंडीबा सुरावार या नावाची यशवंत महाविद्याल नांदेडची १२ वी पासची ची टी. सी. मोंढा ते बसस्थानक ऑटोने प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे.

**–संपर्क पत्ता–**
**कलामंदीरच्या पाठीमागे सोमेश कॉलनी नांदेड मो.७३८५९६८१७२**


## जाहीर प्रगटन

याजाहीर प्रगटनाद्वारे ळविण्यात येत ेकी सागर को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सहकारी संस्था म.लोहा ता.लोहाजि.नांदेड यासहकारी संस्थेचे संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० या कालावधी करिता संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रमदिनांक २३/०६/२०२५ पासून सुरुवात करण्यात येत असून नामनिर्देशन पत्रविक्री व स्वीकृती दिनांक २३/०६/२०२५ ते२७/०६/२०२५ या कालावधीत सहाय्यकनिबंधक सहकारी संस्था लोहा तालुका लोहा,यांचे कार्यालयमेन रोड,चव्हाण कॉम्प्लेक्स.व्यंकटेश गार्डन मंगल कार्यालयाच्या समोर या ठिकाणी सकाळी ११:००ते दुपारी३:०० या वेळेत नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती करण्यात येणार आहे तसेच प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ३०/०६/२०२५रोजी असून संचालक मंडळाच्या निवडी करिता मतदानाची आवश्यकता पडल्यास मतदान दिनांक २७ /०७ /२०२५रोजी होणार आहे निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम सहायक निबंधक सहकारी संस्था लोहा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व संस्थेच्या नोटीस बोर्डावर अडकाविण्यात आलेलाआहे करीता याजाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते.

**स्वाक्षरीत**
**डी.जी.गायकवाड**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**सागर को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सहकारी संस्था म.लोहा ता.लोहा जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार गोविंदराव दिगंबरराव पाटील रा.डोंगरगाव ता.मुदखेड जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येते की, हे की गोविंदराव दिगंबरराव पाटील यांच्या मालकी व ताब्यातील त्यांची मालमत्ता ग्रामपंचायत मालमत्ता क्र.१६६ डोंगरगाव ता.मुदखेड जि.नांदेड ज्याचे क्षे.Adm.Lenght 44 X Width 31 Total area 1364 sq.ft
Adm.Lenght 33 X Width 21 Total area 483 sq.ft
Adm.Lenght 23 X Width 23 Total area 529 sq.ft
असून ज्याची चर्तुसिमा पुर्वेस – गणेशराव व्यवहारे, पश्चिमेस– रोड, दक्षिणेस– मोकळी जागा, उत्तरेस– रोड नमूद चर्तुसिमेच्या आतील मालमत्ता गोविंदराव दिगंबरराव पाटील यांना वारसा अधारे मिळालेली आहे.

हे की गोविंदराव दिंगबरराव पाटील यांच्या मालकी व ताब्यातील त्यांच्या मालमत्ता ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १६६ डोंगरगाव ता.मुदखेड जि.नांदेड हे सदर मालमत्ता त्यांच्या पत्नी अंजली गोविदराव पाटील नावाने बक्षीसपत्र करीत आहेत. तसेच सदर मालमत्तेवर Jana Small Finance Bank Limited यांचेकडे कर्ज घेवून गहाण ठेवत आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, नमूद वर्णन असलेली मालमत्तेच्या वरील व्यवहाराबद्दल कोणाचाही, कुठल्याही प्रकारचा आक्षेप व उजर अथवा काही कुळ, बक्षीस अथवा शासकीय, निमशासकीयख कर्ज हक्कसंबंध, असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपला उजर वा आक्षेप योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासह सदरील पत्यावर नोंदवावा.

**जाहीर प्रगटन देणार**
**गोविंदराव दिगंबरराव पाटील**

**मार्फत**
**ॲड.गजानन सोनाजीराव खनगुंडे**
**सोनाजी पाटील वाडा एस.पी. ऑफिस जवळ वजीराबाद नांदेड मो.९८५०८०३०६१**

बिलोली नगर परिषद बिलोली

## जाहीर प्रगटन

जावक क्रमांक दिनांक:– १९/६/२००५

विषय :– नांव परिवर्तन करण्या बाबत.

घर नंबर ११८७ वार्ड नंबर बिलोली प्लॉट नंबर

श्री. मिरा प्रकाश संगनोर रा. बिलोली ता. बिलोली यांनी अनसूची २ व ३ भरुन दिला असुन त्यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, नगर परिषद मालमत्ता क्र. ११८७ ही जायजाद / मालमत्ता/ प्लॉट/ मोकळी जागा बिलोली नगर परिषदेच्या मालमत्ता विषयक कर नोंदणी रजिस्टर मध्ये श्री. प्रकाश लक्ष्मणराव संगणोर रा. बिलोली यांचे नांवे नोंदविलेली असुन ज्याची चर्तुःसिमा खालील प्रमाणे आहे. ही जायजाद मालमत्ता / प्लॉट/ मोकळी जागा, वारसा हक्काने / खरेदीखता अधारे / वाटणी पत्रका अंधारे अर्जदारांच्या नावे मालमत्ता कर विषयक नोंदवहीत नामांतर करुन नोंदविण्यात यावी. चर्तुः सिमा पुर्वेस – साईनाथ संगमवार यांचे घर पश्चिमेस:–संतोष जोशी यांचे घर, दक्षिण – न.पा.रस्ता उत्तर –न.पा.रस्ता वरिल प्रमाणेच्या नामांतरास ज्यांना आक्षेप असेल त्यांनी ही जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (७) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह / कागदपत्रासह न.प. बिलोली कार्यालयात सादर करावा. मुद्यत सर्पल्यानंतर प्राप्त होणारा कुणाचाही आक्षेप विचारात न घेता अर्जदाराचे नांव मालमत्ता कर नोंदणी रजिस्टर मध्ये नोंदवुन नांव परिवर्तन करण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद बिलोली**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My old Name is ABDULLAH BALKHSHAR which now I am Changing as New Name ABDULLAH BALQASHAR ALJAEADI Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, ADD-5/4/144 ARAB GALLI NEAR JAMA MASJID QILA ROAD ITWARA NANDED

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## पालकमंत्री सावे यांच्या हस्ते जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांना शासकीय वाहनांचे वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेच्यावतीने जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांना नवीन शासकीय वाहनांचे वितरण शुक्रवारी करण्यात आले. जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या वाहनांचा लोकार्पण समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पार पडला. याप्रसंगी पालकमंत्री अतुल सावे यांनी हिरवा झेंडा दाखवून सदर वाहने संबंधित तालुक्यांकडे रवाना केली.



माहूर, हदगाव, कंधार, देगलूर, बिलोली, उमरी व नायगाव या सात पंचायत समित्यांना हे वाहन देण्यात आले आहेत. या वाहनांच्या माध्यमातून तालुकास्तरावरील प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान व परिणामकारक होईल, असा विश्वास पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार भिमराव केराम, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार आनंदराव बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख आणि संबंधित पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी उपस्थित होते.

## डॉ. सुरेश सावंत यांच्या निवासस्थानी पालकमंत्री अतुल सावे व खा. अशोक चव्हाण यांनी केला सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी) –** ज्येष्ठ साहित्यिक तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा बालसाहित्याचा पुरस्कार मिळाल्याबद्दल पालकमंत्री ना. अतुल सावे आणि माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आज त्यांच्या घरी जाऊन डॉ. सावंत यांचा सपत्नीक सन्मान केला.

दोन दिवसांपूर्वीच डॉ. सुरेश सावंत यांना हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तेव्हापासून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अतुल सावे आज जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या निमित्ताने नांदेड शहरात आले असता खा. अशोकराव चव्हाण यांनी डॉ. सुरेश सावंत यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभिनंदन करण्याची सूचना मांडली. त्या सूचनेला पालकमंत्र्यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत डॉ. सुरेश सावंत यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. बैठक संपताच शासकीय वाहनांचा ताफा डॉ. सावंत यांच्या शाहूनगरातील निवासस्थानाकडे रवाना झाला.

यामध्ये पालकमंत्री ना. सावे आणि खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, भारतीय जनता पक्षाचे नांदेड महानगराध्यक्ष, माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली आदींचा समावेश होता. पालकमंत्र्यांना परिचय करून देताना खा. अशोकराव चव्हाण यांनी डॉ. सुरेश सावंत हे ४० वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक व साहित्य चळवळीत अग्रणी असल्याचे सांगितले. त्यावर डॉ. सुरेश सावंत यांनी डॉ. शंकरराव चव्हाण हे संस्कारांचे विद्यापीठ होते आणि मी त्या विद्यापीठाचा विद्यार्थी आहे, असे सांगितले.

शंकररावांच्या जीवनकार्यावर लिहिलेले 'जलशंकर', 'आधुनिक भगीरथ' व 'महाराष्ट्राचे शिल्पकार' तसेच 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी' हे चार ग्रंथ डॉ. सावंत यांनी पालकमंत्री अतुल सावे यांना भेट दिले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनीही यावेळी डॉ. सुरेश सावंत यांना एक पुस्तक भेट दिले. सर्व उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुरेश सावंत यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला.

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचा दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर ह्या शनिवारी (दि.२१) नांदेड दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शनिवारी सकाळी ५ वा. नांदेड रेल्वे स्थानक येथे आगमन व शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सकाळी ५.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी ६ वा. ११ वा आंतरराष्ट्रीय भव्य योग दिन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ७ वा श्री गुरूग्रंथ साहिब हॉल यात्री निवास येथील योग शिबीराला भेट देतील. सकाळी ९ वा. वसंतनगर येथील ब्रम्हकुमारी सद्भावना भवनाला भेट देतील. त्यानंतर सोयीनुसार परभणीकडे त्या प्रयाण करतील.

## खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी व्यक्त केला अधिकाऱ्यांबाबत संताप

**नांदेड (प्रतिनिधी)–** खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी अधिकाऱ्यांबाबत संताप व्यक्त केला. येथील वनविभागाचे उपवन संरक्षक केशव वाबळे यांच्या बाबतीत तीव्र नाराजी व्यक्त केली. अधिकारी पत्रांना उत्तर देत नाहीत, माहिती देत नाहीत. ह्यांच्या दुर्लक्षामुळे किनवट, हदगाव, माहूर, हिमायतनगर तालुक्यातील वन विभागाने रस्ते अडवले असून परिणामी करोडो रुपयांचे मंजुरी असून कामे अडवली जात आहेत, असा संताप जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत व्यक्त केला.

यावर बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाची संयुक्त बैठक घेऊन वन विभागाने अडवलेले रस्ते बाबतीत आढावा घेऊन राज्य शासन व केंद्राकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

यासह आष्टी (ता. हदगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांच्या जागा रिक्त असून जिल्हा आरोग्य अधिकारी यांना वारंवार सांगूनही त्यांना यात गांभीर्य नसल्याचे खासदार आष्टीकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत बोलून दाखवले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी शासनाकडे रिक्त पदाचा प्रस्ताव पाठवून देण्याचे व तात्पुरती व्यवस्था करण्याचे मान्य केले.

हदगाव शहरात व ग्रामीण भागात दररोज वीज पुरवठा बंद केला जातो या बाबत जाब विचारला असता अधिकारी चुकीचे उत्तर देत आहेत हे लक्षात आल्यावर पालकमंत्री अतुल सावे यांनी मला हदगावमधून रात्री २ वाजता कॉल आला होता. ४८ तासांपासून वीजपुरवठा बंद आहे, अशी तक्रार आहे असे सांगताच या बाबतीत सुधारणा करण्याचे आश्वासन अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव यांनी दिले. तालुक्यातील लिंगापूर शिवणी ह्या गावात शिक्षक नाहीत यासह अनेक गावांत पट संख्येत शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार आष्टीकर यांनी केली.

## उमरी तालुक्यात चोर समजून बेदम मारहाण केलेल्या युवकाची ओळख पटली

### पोलिसांकडून नेट ग्रीड तपास प्रणालीचा वापर

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यात चोर समजून ग्रामस्थांनी एका २४ वर्षीय युवकाला बेदम मारहाण केली होती. यात युवकाचा मृत्यू झाला होता. नेटग्रीड प्रणालीमुळे ओळख पटल्यामुळे पुढे या प्रकरणाच्या तपासाला गती आली.

उमरी तालुक्यात असलेल्या धानोरा येथे १० मे रोजी एका युवकाचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. मृतदेहाच्या शरीरावर अनेक जखमा होत्या. पंधरा दिवस उलटले तरी युवकाची ओळख न पटल्याने तपास पुढे सरकत नव्हता. अखेर अत्यंत महत्वाच्या तपासात वापरली जाणारी नेटग्रीड प्रणाली पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेऊन वापरली आणि या मृतदेहाची ओळख पटली. सदर मृतदेह हा हैदराबाद येथील युवकाचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे.

नेटग्रीडमुळे युवकाचा तपास लागला आणि तो युवक हैद्राबादमधील शेख फरदिन असल्याचे निष्पन्न झाले. नातेवाईकांचा शोध घेऊन पोलिसांच्या तपासाला गती आली, तेव्हा धक्कादायक कारण समोर आले. १० जून रोजी हैद्राबाद येथून तो युवक धानोरा रेल्वे स्थानकावर उतरला होता. गावात अनोळखी व्यक्ती फिरत असल्याने ग्रामस्थानी त्याला हुसकावून लावले. पुढे तो एका आखाड्यावर गेला. या ठिकाणी असलेल्या काही जणांनी त्याला चोर समजून बांधून मारहाण केली. यात त्याचा मृत्यू झाल्याचे पोलीस तपासात उघड झाले. या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी अल्पवयीन आहेत.

या प्रकरणात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान नेटग्रीडमुळे ओळख पटवणे शक्य झाले आणि पुढे तपास लागल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.

## सराईत आरोपीची ग्रामीण पोलिसांनी विष्णुपुरी भागातून काढली धिंड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** दहशत निर्माण करून लोकांना लुटणे, मारहाण करणे, जबरी चोरी, हप्ता मागणे या सारख्या अनेक गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपी प्रभाकर हंबर्डे याची विष्णुपुरी भागातून धिंड काढण्यात आली. नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी काढुन आरोपी विरोधात तक्रार देण्यासाठी नागरीकांनी पुढे येण्याचे आवाहन केले.

आरोपी प्रभाकर हंबर्डे याच्यावर दहापेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. मोक्का मधून त्याचा जामीन झाला होती, जामीनावर असताना त्याने एकाला गंभीर जखमी केले. तेव्हापासून तो फरार होता. अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर त्याने गावठी पिस्टल रोखल्याने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी त्याच्यावर स्वतःच्या पिस्टलमधून फायर केले होते. त्यात त्याला एक गोळी लागून तो जखमी झाला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली होती.



आरोपीची विष्णुपुरी भागामध्ये मोठी दहशत होती. तो लोकांना पैसे मागणे लूटने जबरी चोरी करणे, खंडणी मागणे हप्ता मागणे, दरोडा टाकणे असे अनेक गुन्हे त्याच्यावर दाखल होते. त्याच्या भीतीमुळे काही नागरिक तक्रार देणेसाठी समोर येत नव्हते किंवा तक्रारी करत नव्हते. त्यामुळे त्याची दहशत संपावी म्हणून नांदेड ग्रामीण पोलिसांनी त्याची विष्णुपुरी भागामध्ये रस्त्याने धिंड काढली. यावेळी रस्त्यावर दुतर्फा मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ, युवक यांनी गर्दी केली होती. सामान्य नागरिकांचा कायद्यावर विश्वास बसावा व कायद्यापेक्षा कोणी मोठा नाही याची जाणीव व्हावी म्हणून या सराईत आरोपीला विष्णुपुरीच्या मुख्य रस्त्यावरून हातकडी घालून फिरविले.

दरम्यान, आरोपी विरोधात कोणाला काही सांगायचे असेल, तक्रार करायची असेल, साक्ष द्यायची असेल तर समोर यावे पोलीस स्टेशनला येऊन तक्रार द्यावी किंवा त्यांचे नाव गोपनीय ठेवायचे असेल तर तसे सांगावे, हा किंवा इतर कोणताही आरोपी सामान्य नागरिकांना त्रास देत असेल, गुंडगिरी करत असेल तर याबाबत ११२ ला किंवा पोलीस स्टेशनच्या मोबाईलवर फोन करून किंवा पोलीस स्टेशनला येऊन माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय कांबळे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस कर्मचारी सहभागी होते.

## दरोड्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलिसांनी मुलतान चिखली येथील सहा जणांना घातक हत्यारांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना पकडले. त्यांना किनवट येथील न्यायालयाने चार दिवसांच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे.



किनवट तालुक्यातील सारखणी-मांडवी रस्त्यावर १९ जून २०२५ रोजी मध्यरात्री ऑटो (टीएस १६ युडी २९२४) दिसला. त्यामध्ये काहीजण दबा धरून बसले असल्याचे पोलिसांना दिसले. पोलिसांनी ऑटो थांबवून नावे विचारली असता शेख फारूक शेख कुर्बान (वय ३५), शेख पाशा शेख हमजा (वय ३२), शेख अजीम शेख अवनाक (वय ३५), शेख गुलफाम शेख शौकत (वय २३), शेख आफ्रिदी शेख जैनुद्दीन (वय २५), शेख जलाल शेख शौकत (वय २४) अशी सांगितली. हे सर्व जण राहणार मुलतान चिखली तालुका किनवट येथील आहेत. त्यांच्याकडे दरोडा घालण्याच्या तयारीसाठी लागतात ती सर्व घातक शस्त्रे मिळून आली. या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किनवट न्यायालयाने या सहा जणांना चार दिवस पोलीस कोठडीत पाठवले आहे. सिंदखेडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर, पोलीस अंमलदार गजानन कुमरे, गोविंद सतीश कोंडा पलकुलवार, रघुनाथ मडावी, प्रफुल्ल पवा संदीप वानखेडे, संजय शेंडे, रविकांत कांबळे, श्याम चव ज्ञानेश्वर वेलदोडे यांनी ही कार्यवाही केली. अपर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराय धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी कौतुक केले.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज विविध उपक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत शनिवारी दि. २१ जून रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, गाव स्वच्छता व पर्यावरणीय उपक्रम राबविले जाणार आहेत. अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली.

हरित योग या संकल्पनेअंतर्गत यावर्षी योग दिन साजरा होत असून पारंपरिक योगासोबतच पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे योगसत्रासोबत वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलस्रोत व पायाभूत सुविधांची स्वच्छता आणि पर्यावरणीय जागृती हे घटकही कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करण्यासाठी योग संगम पोर्टलवर नोंदणी व मार्गदर्शक सूचना QR कोडव्दारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच योग सत्रे जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केलेल्या स्वच्छ परिसरात योगाचे आयोजन करण्यात येणार आहे.

२१ जून रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम येथून देशव्यापी योग संगम कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सकाळी ६:३० ते ७:४५ या वेळेत होणार असून, त्याचवेळी जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये सामूहिक योगसत्र पार पडणार आहे. गाव स्तरावरील ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांनी स्थानिक पातळीवर या कार्यक्रमाचे आयोजन करताना परिसर स्वच्छता, पायाभूत सुविधा व जलस्रोत स्वच्छ ठेवावेत, तसेच सहभागाचे छायाचित्र शासन संकेतस्थळावर अपलोड करावेत, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com